
बीड | सोमवार,दि.२१ एप्रिल २०२५ |वर्षे४थे| अंक२४९वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के





## गिधाडांच्या टोळीला कंटाळून तरुणीने घेतला गळफास
# बीड पून्हा हादरले!

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना पत्र

मयत साक्षी हिच्या आईने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आज आपण उपमुख्यमंत्री आहात, मात्र माझ्यासाठी तुम्हीच लाडक्या बहिणीचे मुख्यमंत्री आहात, तुमच्या लाडक्या बहिणीच्या मुलीने गळफास घेऊन जीवन संपविले, तुमची भाची साक्षी या जगात परत येणार नाही, हे आम्हाला माहित आहे, मात्र त्या क्रूर नराधमांना देखील तेवढीच शिक्षा होणे अपेक्षित असल्याचे साक्षीच्या आईने म्हंटले आहे.

- मोकाट आरोपी अभिषेक कदमला फासावर द्या
- आरोपीच्या पोलीस बहिणीलाही सहआरोपी करावे
- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मयत साक्षीच्या आईचे पत्र
- धाराशिवचा गुन्हा बीडमध्ये वर्ग करण्याची मागणी
- बीडच्या केएसके महाविद्यालयात शिकत होती साक्षी

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जिल्ह्यात एका पाठोपाठ एक धक्कादायक घटना घडू लागल्या आहेत. मारहाणीचे व्हिडीओ, हत्या, लूटमार, ब्लॅकमेलींग अशा घटनांमुळे आधीच जिल्ह्याची बदनामी झालेली असतांना आता बीडमध्ये आणखी एक भयानक प्रकार घडल्याचे समोर आले आहे. बीड शहरातील पालवन चौक परिसरात राहणाऱ्या आणि येथीलच केएसके महाविद्यालयात बी.ए. तृतीय वर्षाच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या दलित समाजातील २० वर्षीय विद्यार्थिनीने कॉलेजमधील मुलाच्या छेडछाडीला कंटाळून धाराशिव या मामाच्या गावी जाऊन आत्महत्या केल्याची घटना १४ मार्च २०२५ रोजी घडली. विशेष म्हणजे दि.२० एप्रिल रोजी तिचं लग्न होणार होतं. तत्पुर्वीच हा प्रकार घडल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या प्रकरणी मुलीच्या आईने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन पाठवून या प्रकरणाला वाचा फोडली आहे. छेडछाड करणाऱ्या त्या गुंडांचा खात्मा करुन आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी त्यांनी केली आहे. एवढेच नव्हे तर बीडच्या केएस के महाविद्यालयातील इतर दोन मुलींनी देखील छेडछाडीला कंटाळून आत्महत्या केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, माझी मुलगी साक्षी तिला हवाई सुंदरी व्हायचे होते. मात्र एका क्षणात ती नाहीशी झाली. काही मुलांनी तिची छेड काढली आणि साहेब, तुमच्या लाडकी बहिणीच्या मुलीने गळफास घेऊन जीवन संपविले. साहेब, आम्ही आस धरुन आहोत. तुमची भाची साक्षी या जगात परत येणार नाही, हे आम्हाला देखील माहित आहे. मात्र त्या क्रुर नराधमांना देखील तेवढीच शिक्षा होणे अपेक्षित आहे. आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब एका कार्यक्रमानिमित्त आमच्या बीड जिल्ह्यात आले. ते राज्याचे मुख्यमंत्री आहेत. सर्वांना माहित आहे, आपण

### साक्षीला हवाई सुंदरी व्हायचे होते

साक्षी बीडच्या केएसके कॉलेजमध्ये बी. ए. तृतीय वर्षात शिक्षण घेत होती. तिला हवाई सुंदरी व्हायचे होते, मात्र एका क्षणात ती नाहीशी झाली. काही मुलांनी तिची छेड काढली म्हणून तिने जीवन संपविले. मामाच्या गावी धाराशिवमध्ये असतांना आत्महत्या करण्याच्या काही मिनिटे आधीच साक्षी माझ्याशी बोलली आणि त्यानंतर काही वेळातच तिने हे टोकाचे पाऊल उचलले.

### आरोपी अभिषेक कदमला अटक

साक्षी कांबळे प्रकरणात आरोपी अभिषेक कदम याला अटक करण्यात आलेली आहे. मात्र त्याला लगेचच जामीन सुद्धा मिळालेला आहे. यामुळे पुनः एकदा बीडच्या कायदा सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

### कोणत्या नेत्याचे नाव घेवून धमकाविले

ज्या मुलाच्या छेडछाडीला कंटाळून साक्षीने आत्महत्या केली तो मुलगा प्रत्येक वेळी बीडमधील नेत्यांची नावे घेऊन मुलीला धमकावयाचा, ब्लॅकमेल करायचा. तुला काहीही केलंतरी माझे काहीच होत नाही, माझ्या मागे माझा नेता आहे असे तो म्हणायचा. धाराशिवमध्ये पोलिसात घटनेची नोंद झाल्यानंतर त्या ठिकाणी सुद्धा तो ४ ते ५ गाड्या घेऊन आला होता, असे मयत साक्षीच्या आईने सांगितले. त्याने कोणत्या नेत्यांची नावे घेतली, कोणाची भीती दाखविली हे योग्य वेळी सांगणार असल्याचेही साक्षीच्या आईने सांगितले.

असला असता तर पिडित बहिणीला भेटल्याशिवाय गेला नसता. याची प्रचिती महाराष्ट्राला आणि लाडक्या बहिणींना आहे. साहेब, बीडमध्ये केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (केएसके) महाविद्यालय आहे, याच महाविद्यालयात कला शाखेच्या तृतीय वर्षात शिक्षण घेत होती. काही मुलांनी तिची छेड काढली, तिला ब्लॅकमेल करून तिच्यासोबत अनैतिक कृत्य केले. जबरदस्ती व्हिडीओ आणि फोटो काढण्यात आले, या अत्याचाराला असाह्य होवून साक्षीने मामाच्या घरी धाराशिव येथे जावून गळफास घेत आत्महत्या केली.

आम्ही बीडचे रहिवासी आहोत, आरोपी देखील बीडचाच राहणारा आहे. माझ्या पान २ वर

बी.एम. प्रतिष्ठान
बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

## कड्यात व्यापाऱ्याचे घर फोडले
### चोरी:पोलिस पाहताच,चोरट्यांची भागंमभाग



पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा: येथील आडत दुकानदार दिलीप बलदोटा यांच्या घरातील दोन महिला व पुरुषांना शस्त्राचा धाक दाखवून अज्ञात चोरट्यांनी सोने, चांदीसह रोख रक्कम मिळून असा २ लाख ३२हजार रुपयांचा ऐवज लांबविला. सदर घटना रविवारी मध्यरात्री तीन वाजेच्या सुमारास कड्यातील धामणगाव रस्त्यालगत कन्या शाळेसमोर असलेल्या बलदोटा यांच्या घरी घडली.याबाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, धामणगाव रस्त्यालगत असलेल्या भगिनी निवेदिता कन्या शाळेसमोर दिलीप बलदोटा व त्यांचे बंधू कुटुंबासह राहायला आहेत.

रविवारी पहाटे तीनच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी बंगल्याचा दरवाजा कटावणीने तोडून घरात प्रवेश केला, मात्र तत्पूर्वी चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेरे सुरुवातीलाच तोडून काढले व घरातील वेगवेगळ्या रूम मधील कपाटे उचकून त्यातील रोख रक्कम एक लाख रुपये आणि एक लाख तीस हजाराचे सोन्याचे दागिने असा एकूण दोन लाख ३२ हजारांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी लांबविला. यावेळी घरात असलेले दिलीप बलदोटा व त्यांच्या पत्नी यांना जाग आली असता चोरट्यांनी शस्त्राचा धाक दाखवून घरात दहशत निर्माण केली. यावेळी बलदोटा यांच्या बंगल्याजवळील एका घराच्या छतावर काहीजण मजूर झोपले होते. त्यांना अचानक जाग आल्याने चोरीचा संशय आला, म्हणून शेजा-यांनी पोलिसांना फोन केला व काही क्षणातच विभागीय रात्रगस्तीवर असलेले सपोनि विजय नरवाडे, पोशि सचिन गायकवाड, पान २ वर

## कार्यकर्त्याच्या कुटुंबाला वाऱ्यावर सोडणार नाही
### पंकजा मुंडे: पत्नीला नोकरी देण्याचा दिला शब्द

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:भाजपचे जिल्हा विस्तारक स्व. बाबासाहेब आगे यांच्या कुटुंबियांशी राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी दुपारी दूरध्वनीवरून संवाद साधला. आगे कुटुंबाला आर्थिक मदत करत त्यांच्या पत्नीला नोकरी मिळवून देण्याचा शब्द त्यांनी दिला. बीडच्या पुढील दौऱ्यात आपण आगे परिवाराची प्रत्यक्ष भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ना. पंकजाताई मुंडे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत घाटशीळ पारगाव येथे नारळी सप्ताहात उपस्थित होत्या. नियोजित दौर्यानुसार त्या किट्टी आडगाव येथे जाऊन स्व. बाबासाहेब आगे यांच्या परिवाराला भेटणार होत्या परंतू अचानक मिटिंगसाठी मुंबईला जावे लागल्याने त्यांच्या सूचनेनुसार भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी भाजपच्या पान २ वर



## बाप-लेकावर प्राणघातक हल्ला
### खळबळ:माजलगाव येथील ढाब्यावर घडली घटना

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:राष्ट्रीय महामार्ग -६१वरील माजलगाव -पाथरी मार्गावर असलेल्या माजलगाव शहरा पासुन ४किमी अंतरावर नागडगाव पाटी कॉर्नर वरील गावरान ढाबा मालक महादेव गायकवाड (५४वर्षे)रा.मंजरथ रोड माजलगाव यांच्या वर २०एप्रिल रोजीच्या संध्याकाळी ७:३० ढाब्यावर बसलेल्या माजलगाव तालुक्यातील आनंदगाव येथील ग्राहकांनी बीला च्या कारणाने डोक्यावर वार करून प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. या हल्लूयात ढाबा मालकाचा मुलगा (२२वर्षे) याच्या वर पण हल्ला केल्याची माहिती समजली आहे दरम्यान अत्यावस्थ महादेव गायकवाड यांना माजलगाव शहरातील डॉ.गिलबिले यांच्या बायपास रोड वर असलेल्या संजीवनी हॉस्पीटल मधे दाखल केले होते. त्यानंतर काही तासाने संजीवनी हॉस्पीटल चे प्रमुख डॉ.ज्ञानेश्वर गिलबिले यांनी शेवटच्या टप्प्यात सल्ला दिला की,महादेव गायकवाड यांना पान २ वर

## धाराशिव पोलीसांची मोठी कारवाई
### दणका:बारा कोटीचा मुद्देमाल जप्त!

पुण्यभूमी प्रतिनिधी



कळंब:धाराशिव पोलीस व अन्न औषध प्रशासनाच्या संयुक्त पथकाने धाराशिव जिल्ह्यात मोठी कारवाई करीत एका टोल नाक्यावर दहा ते बारा गाड्या पकडल्या आहेत या गाड्यात भेसळ युक्त सुपारी असल्याचे समजले कर्नाटक राज्यातून महाराष्ट्रात खराब भेसळयुक्त सुपारी आणली जात असल्याची माहिती मिळताच धाराशिव पोलीस व अन्न औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली व जवळपास दहा ते बारा कोटी रुपयांचा माल जप्त करण्यात आला यात सुपारीची किंमत अंदाजे चार ते पाच कोटी रुपयांच्या घरात आहे खराब असलेली सुपारी व इतर पदार्थ गुटखा यात मिसळली जात असल्याचा पान २ वर

## केवड सबस्टेशन गेले कुठे?
### बोंबला:मागिल महीन्यात होणार होते सबस्टेश

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज: तालुक्यातील केवड येथे सबस्टेशन होनार होते परंतु अनेक दिवसांपासून केवड सबस्टेशन होनार हे स्वप्नच राहिले आहे व आमदारा नमीता लोखंडे यांनी निवडणूक तोंडावर सबस्टेशन होनार असा बोबाट केला होता व आता निवडणूक होऊन निवडून येऊन अनेक महीने झाले आहे परंतु आणखी केवड येथील सबस्टेशनचे कुठे नामो निशाण सुध्दा नाही हे दुर्दैव आहे की आमदार नमीता लोखंडे निवडणूकीत निवडुन येईपर्यंत मोठ्या प्रमाणावर मोकाट आश्वासन देऊन निवडून येतात नंतर त्या प्रश्नाकडे गांभीर्याने दुर्लक्ष करतात आमदार नमीता लोखंडे यांचे व सासरे नंदकिशोर मुंदडा यांचे असे काम आहे नाव मोठे लक्षण खोटे कारण आमदार होण्यअगोदर अनेक महीन्या पुर्वी केवड येथे सबस्टेशन होनार असे आश्वासन विद्यमान आमदार पान २ वर

### खा.बजरंग सोनवणे
### परळीमध्ये राशप पक्षाची बैठक
## निवडणुकीच्या अनुषंगाने कामाला लागा

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची परळी विधानसभा मतदारसंघात मोठी ताकद आहे. साहेबांच्या विचारांना मानणारा मोठा वर्ग इथे आहे. जात, पात, धर्म, पंथ, भेद विसरून इथल्या मतदारांनी लोकसभा निवडणुकीत मतदान केले. परळी मतदारसंघातून किंवा संपूर्ण बीड जिल्ह्यातून जे मला मतदान झाले आहे ते केवळ स्थानिक कार्यकर्ते आणि नेतेमंडळी यांच्या बळावर झालेले आहे. जनतेच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी माझ्यासहीत पक्षाच्या प्रत्येकाने तत्पर असले पाहिजे, आगामी निवडणुकांना सामोरे जाण्याची तयारी करा, लोकांची कामे करा अशा सूचना बीडचे खासदार पान २ वर



### दत्तात्रय गव्हाणे यांचा पक्षात जाहीर प्रवेश

शिवक्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष दत्ताभाऊ गव्हाणे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील पक्षाच्या संपर्क कार्यालयात झालेल्या कार्यकर्ता संवाद बैठकीत खा.बजरंग बप्पा सोनवणे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के पाटील यांनी त्यांना प्रवेश देऊन पक्षात स्वागत केले.

### सर्वांना सोबत घेऊन काम करणार:फड

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात काम करत असताना अनेक पातळीवर मी काम करतो. माझ्या पक्षाचे कार्यालय शहराच्या प्रमुख ठिकाणी आहे. कार्यालयातील माझ्या प्रत्येक माणसाला मी सामान्यांची कामे करा हे सांगितलेलं आहे. निवडणूक कुठलीही असो, कार्यकर्ता कोणीही असो, मात्र प्रत्येक माणूस हा माझा माणूस आहे म्हणून मी काम करणार आणि जपणार असे प्रतिपादन पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केले.

## धार्मिक युद्धाला सरन्यायाधीश जबाबदार
### चर्चेतले:भाजप खासदाराचा खळबळजनक आरोप

पुण्यभूमी प्रतिनिधी



दिल्ली:वक्फ दुरुस्ती कायद्याबाबत देशभरातील राजकीय वातावरण तापल्याचे पाहायला मिळत आहे. अशात आता भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांचे एक विधान समोरले आहे. त्यांनी जर सर्वोच्च न्यायालय कायदा करणार असेल तर संसद भवन बंद केले पाहिजे, असे म्हटले. याबाबत एक्सवर त्यांनी व्हीडीओ शेअर केले. यावेळी त्यांनी देशात होणा-या सर्व धार्मिक युद्धाला भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना जबाबदार आहेत, असा खळबळजनक आरोप केला.

देशात धार्मिक युद्धे भडकविण्यास सर्वोच्च न्यायालय जबाबदार आहे. सर्वोच्च न्यायालय आपल्या मर्यादेपलिकडे जात आहे. जर प्रत्येक गोष्टीसाठी सर्वोच्च न्यायालयात जावे लागत असेल तर संसद आणि विधानसभा बंद केली पाहिजे, असे ते म्हणाले. तुमची नियुक्ती करणा-यांनाच तुम्ही कसे निर्देश देऊ शकता, राष्ट्रपती पान २ वर

# दिलखुलास व्यक्तिमत्व म्हणजे अण्णासाहेब राठोड

एखादी व्यक्ती प्रसिद्ध होण्यामागं त्या व्यक्तीचं व्यावसायिक यश, सामाजिक कार्य, मनमिळाऊपणा , उमदं व्यक्तिमत्व, कुटुंबवत्सल वृत्ती, एखाद्या व्यक्तीच्या मदतीसाठी सर्वस्व झोकुन देण्याची वृत्ती असे गुण कारणीभूत असतात. बऱ्याच वेळा एक व्यक्ती एक गुण असा आपणास अनुभव येतो. पण अण्णासाहेब राठोड ह्यांच्या बाबतीत मात्र हे सर्व गुण एकत्र सामावलेले दिसुन येतात. सरळ साधेपणा व मनमिळाऊ स्वभावामुळे राजकारणामध्ये व उद्योग क्षेत्रामध्ये आपला वेगळाच ठसा निर्माण केला आहे. कर्तृत्व जन्म जात नसून कर्तुत्व हे निर्माण करावे लागत असते आणि याच स्वभावामुळे त्यांनी कार्यकर्त्यांसह सामान्य नागरिकांच्या मनामध्ये निर्माण केले आहे. समाजकार्याची आवड म्हणून व्यवसाय करत असताना समाजकार्याच्या माध्यमातून



राजकारणाशी जोडल्या गेलेला निखळ मनाचा माणूस अल्पावधीतच शरदचंद्रजी पवार यांच्या पक्षाचा तालुका अध्यक्ष होतो आणि काही काळातच निवडणुका लागतात आपल्या पदाचा फायदा पक्षासाठी व उमेदवारासाठी कसा होतो याचा प्रत्यय लोकसभा निवडणुकीमध्ये पाहायला मिळाला. नियोजनबद्ध प्रचार यंत्रणा वापरून चोख नियोजन करून लोकसभेच्या उमेदवाराला तालुक्यात पहिल्यांदाच लीड मिळाली. अनेक व विविध पक्षाच्या तालुक्यातील प्रमुख व्यक्तींना एकत्र करून निवडणुकीत वेगळीच कमाल केली. राजकारणाबरोबर सामाजिक कार्यात अनेक लोकांना रात्री अपरात्री मदत करून सामाजिक दायित्व पूर्ण करतात. कार्यकर्त्यांना सांभाळणारा, संघटनेची शिस्त पाळणारा. अतिशय संयमी व मुख्य म्हणजे वेगवेगळ्या प्रवृत्तीच्या व विचारांच्या लोकांना एकत्र ठेवण्याची कला असलेला माणूस म्हणजे अण्णासाहेब राठोड. राजकीय, सामाजिक आणि सहकारी क्षेत्रातील संपूर्ण वाटचालीत अण्णासाहेब राठोड यांनी अतिशय निरपेक्ष, नि:स्वार्थ आणि नि:स्पृह वृत्तीने काम केले. त्यांच्या या कार्यकर्तृत्वामुळे सामाजिक आणि राजकीय वर्तुळातही त्यांचे अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्वांशी चांगले संबंध आहेत. शरदचंद्रजी पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षामध्ये काम करत असताना पक्षामधील अनेक बड्या नेत्यांशी त्यांची जवळीक आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये पूर्ण ताकदीनिशी उतरण्याचा प्रयत्न केला होता. गेवराई विधानसभा मतदारसंघातून अनेक ठिकाणाहून अण्णासाहेब राठोड यांनी उभा राहावे अशी मागणी होती परंतु पक्ष आदेश महाविकास आघाडीच्या निर्णयाला समजून घेऊ महाविकास आघाडीने दिलेल्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. जे काम करणार ते इमानदारीने करणार, जे काम हाती घेतले ते पूर्णत्वाकडे नेणार असा स्वभाव असल्यामुळे कार्यकर्त्यांची फळी निर्माण करण्यास वेळ लागला नाही. सामान्यांना आपलेसे करणे ही मोठी कठीण गोष्ट असते. अण्णासाहेब राठोडांना ती लिलया जमते; कारण ते जनसामान्यांच्या प्रश्नसमस्यांना मनापासून भिडतात. लोकांच्या गरजा ओळखून प्रश्नांना उत्तरे शोधण्याच्या कामात गढून गेलेले अण्णासाहेब राठोड त्यांच्या हरएक कृतीकार्यातून बघायला मिळतात. असाच नेता लोकांना 'आपला' वाटतो. कारण या नेत्याच्या शब्दांत पोकळ आश्वासन नसते तर प्रयत्नांच्या पूर्ततेची खात्री असते. कारण स्वत: अण्णासाहेब राठोड यांना जनसामान्यांच्या प्रश्नांची जाण असते. आपल्यापासून दूर राहणारा, महागड्या मोबाइलवर बोलत आलिशान गाड्यांमधून फिरणारा नेता तरुणाईला नकोय. त्यांना नेता हवाय तो त्यांच्यामध्येच उठ–बस करणारा, त्यांच्याशी संवाद साधणारा, त्यांच्या समस्या जाणून घेणारा. हे सर्व गुण अण्णासाहेब राठोड यांच्यात असून युवा पासून ते ज्येष्ठांपर्यंत लहानांपासून ते थोरांपर्यंत सर्वांचे मन जपण्याचं काम ते आपल्या समाजकार्याच्या माध्यमातून करत आहे. तळागाळातल्या कार्यकर्त्यांना ओळखणारा, जनतेच्या प्रश्नांची अचूक जाण असलेला दूरदर्शी, पारदर्शी आणि सामान्यांना आपला वाटणारा नेता म्हणजे अण्णासाहेब राठोड. यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

लेखक
सुशिल टकले
( पत्रकार, गेवराई )

## सुधीर पठाडे राज्यस्तरीय आदर्श सरपंच सेवारत्न पुरस्काराने सन्मानित

आष्टी/प्रतिनिधी

सामाजिक क्षेत्रात गेल्या काही वर्षातील सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरी दखल घेऊन आणि दैनिक तुफान क्रांती परिवाराच्या वतीने आष्टी तालुक्यातील पांढरी गावचे युवा सरपंच सुधीर पठाडे यांच्या कार्याचा गौरव म्हणून तसेच प्रोत्साहन हेतूने २०२५ चा राज्यस्तरीय आदर्श सरपंच सेवा रत्न पुरस्काराने महाराष्ट्र राज्य सरपंच परिषद मुंबई प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, दैनिक तुफानचे महाराष्ट्र राज्य विशेष प्रतिनिधी अनिरुद्ध गायकवाड यांच्या शुभहस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. दैनिक तुफान क्रांती या वृत्तपत्र तसेच संपादक मिर्झा गालिब रजाक मुजावर, उपसंपादक जावेद अत्तार,कार्यकारी संपादक तनवीर मुजावर या वृत्तपत्र परिवाराकडून दरवर्षी दैनिक तुफान क्रांती वृत्तपत्राच्या वर्धापन दिना चे औचित साधून संपूर्ण महाराष्ट्रातील



विविध क्षेत्रातील मान्यवरांचा आदर्श सेवा गुणगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत असते. यावर्षीच्या वर्धापनदिनी आष्टी तालुक्यातील पांढरी गावचे युवा सरपंच सुधीर वैजीनाथ पठाडे यांना गावामध्ये विविध विकासकामे केल्याबद्दल तसेच आदर्श सरपंच म्हणून सामाजिक राज्यस्तरीय सेवा रत्न पुरस्कार दैनिक तुफान क्रांतीने त्यांना पुरस्कार देऊन सरपंच परिषद महाराष्ट्र राज्य मुंबई चे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, राज्य विशेष प्रतिनिधी अनिरुद्ध गायकवाड यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी समवेत आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण पोकळे व भाऊसाहेब वायसे उपस्थित होते. युवा सरपंच सुधीर पठाडे यांना सामाजिक क्षेत्रातील आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित केल्याने आमदार सुरेश धस, माजी जि. प. सदस्य देविदास धस, युवा नेते जयदत्त धस, श्याम धस,सागर धस यांच्यासह आष्टी तालुका सरपंच परिषद तसेच पांढरी ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## नामदेवराव क्षीरसागर, मोतीरामजी वरपे, काझी हयातुल्ला जिल्ह्याच्या पत्रकारितेची शान-सुनील क्षीरसागर

### संपादक सुनील क्षीरसागर यांनी केले काझी कुटुंबीयांचे सांत्वन

गेवराई/प्रतिनिधी

दैनिक चंपावतीपत्रचे दिवंगत संस्थापक संपादक नामदेवराव दादा क्षीरसागर, दैनिक झुंजार नेताचे दिवंगत संस्थापक संपादक मोतीराम दादा वरपे आणि गेवराई तालुक्याचे पहिले दिवंगत ज्येष्ठ पत्रकार काझी हयातुल्ला यांनी कठोर परिश्रम घेऊन कष्टाची आणि मेहनतीची पत्रकारिता केली असून त्यांनी अनेक पत्रकार घडवले आहेत. हे तिघेही दिवंगत ज्येष्ठ पत्रकार बीड जिल्ह्याच्या पत्रकारितेची आन, बाण आणि शान होते. त्यांचे नाव सर्वांना चीरस्मरणात राहील. आजच्या पत्रकारांनी त्यांचा आदर्श घ्यावा, अशी प्रतिक्रिया दैनिक चंपावतीपत्रचे विद्यमान संपादक सुनील क्षीरसागर यांनी व्यक्त केली.

गेवराई तालुक्याचे पहिले जेष्ठ पत्रकार काझी हयातुल्ला यांच्या निधनाचे वृत्त समजल्यानंतर दैनिक चंपावतीपत्रचे संपादक सुनील क्षीरसागर यांनी शनिवार, दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी दुपारी त्यांच्या निवासस्थानी जाऊन पत्रकार काझी अमान यांच्यासह काझी कुटुंबीयांचे सांत्वन केले. याप्रसंगी चंपावतीपत्रचे



व्यवस्थापक भीमराव आखाडे, तालुका प्रतिनिधी सुदर्शन उर्फ भैय्या देशपांडे आदी आवर्जून उपस्थित होते. यावेळी सुनील क्षीरसागर यांनी काझी हयातुल्ला, नामदेवराव क्षीरसागर, मोतीरामजी वरपे यांच्यासह त्यांच्या काळातील ज्येष्ठ पत्रकारांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले की, दैनिक चंपावतीपत्रचे संस्थापक संपादक असलेले माझे वडील नामदेवराव दादा क्षीरसागर आणि ज्येष्ठ पत्रकार काझी हयातुल्ला साहेब यांचे बालपण गेवराईतच गेल्यामुळे या दोघांचा पन्नास वर्षांचा सहवास होता. तर मोतीरामजी वरपे दादाही त्यांचे सुरूवातीपासूनचे सहकारी मित्र होते. या तिघांनीही कठोर परिश्रम घेऊन सोबत पत्रकारिता केली. या तिघांची पत्रकारिता कष्टाची आणि मेहनतीची होती. त्यांनी अनेकांना वृत्तपत्र क्षेत्रात आणले, त्यांना तयार केले आणि जिल्ह्यात अनेक पत्रकार घडवले. ते बीड जिल्ह्याच्या पत्रकारितेची आन, बाण आणि शान होते. जेव्हा कधी बीड जिल्ह्याच्या पत्रकारितेचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा या तिघांच्या नावाचा आवर्जून उल्लेख केला जाईल. त्यांच्याशिवाय पत्रकारितेचा इतिहास पूर्ण होणार नाही. त्यांचे नाव सर्वांच्या चीरस्मरणात राहील. आजच्या पत्रकारांनी त्यांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन संपादक सुनील क्षीरसागर यांनी केले. काझी हयातुल्ला साहेबांच्या पत्रकारितेतील योगदानाची दखल घेऊन दैनिक चंपावतीपत्रच्या शानदार त्रिदशकपूर्ती समारंभात महाराष्ट्राचे तत्कालीन उपमुख्यमंत्री गोपीनाथरावजी मुंडे साहेब आणि माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला होता, असेही त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. काझी साहेब आजारी असताना माझे वडील नामदेवराव दादा क्षीरसागर आणि माझी त्यांना भेटायची खूप इच्छा होती. परंतु ती पूर्ण होऊ शकली नाही, अशी खंत व्यक्त करून या दुःखद प्रसंगी दैनिक चंपावतीपत्र परिवार काझी कुटुंबीयांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचे शेवटी त्यांनी सांगितले. याप्रसंगी काझी हयातुल्ला यांचे ज्येष्ठ चिरंजीव पत्रकार काझी अमान, द्वितीय चिरंजीव काझी शौकत, कनिष्ठ चिरंजीव काझी शकील यांच्यासह काझी परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## पान एक वरून

**गिधाडांच्या टोळीला कंटाळून तरुणीने**

मुलीने मामाच्या गावी म्हणजेच धाराशिव येथे असताना गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यामुळे तो गुन्हा धाराशिव सिटी पोलिस ठाण्यात नोंद झाला आहे. शिंदे साहेब, तुम्हीच आम्हाला न्याय देऊ शकता यावर आम्हाला ठाम विश्वास आहे. यात अनेक पोलिस अधिकाऱ्यांनी चुकीचे काम केले आहे. धाराशिव येथील पोलिस उपअधीक्षक स्वप्नील राठोड यांनी आमचा कसलाही जबाब घेतला नाही. उलट आम्हाला अपमानित केले. आम्हाला तासंतास कार्यालयाबाहेर बसविण्यात आले. (आम्हाला ताटकळत बसविले याचे सी.सी.टी.व्ही. कॅमेरात कैद आहे). आरोपीची बहिण देखील यात आरोपी आहे, मात्र ती पोलिस दलात कार्यरत असल्याने धाराशिव पोलिस आम्हाला कसलीही मदत करत नाहीत. ज्याच्या आरोपी मुलाने छेडखानी केली, माझ्या मुलीला ब्लॅकमेल केले त्याच्या मोबाईल मधील केलेली चॅटिंग पोलिसांनी अद्याप उघड केली नाही. याच दरम्यान के. एस. के. महाविद्यालयातील इतर दोन मुलींनी देखील छेडखानीला कंटाळून आत्महत्या केली. आरोपी मुलाचे बीड शहरातील गुंडांशी संबंध असल्याने कोणताही पालक पुढे येऊन फिर्याद देत नाहीत. या गुंडांची दहशत पाहता आम्हाला कोणाला न्याय मागायचा हा प्रश्न पडला आहे. साहेब आपण मुख्यमंत्री किंवा गृहमंत्री असला असता तर या गुंडांचा खात्मा करुन आम्हाला न्याय दिला असता, आताही केवळ तुमच्याकडून आम्हाला न्यायाची आस आहे, आपण आम्हाला न्याय देऊंन गुंडांना शिक्षा द्याल अशी मागणी निवेदनात कोयना विटेकर यांनी केली आहे.

**कड्यात व्यापाऱ्याचे घर**

चालक प्रताप घोडके, पोकॉ सय्यद मजहर, दीपक भोजे, या कर्मचा–यांनी घटनास्थळी धाव घेताच, पोलिसांना पाहताच त्या चोरट्यांनी पोलिसांवर दगडफेक करीत अंधाराचा फायदा घेत पळ काढला. त्यामुळे संभाव्य अनर्थ टळला असल्याचे बोलले जात आहे. याप्रकरणी पोलिसांनी तपासाला गती देत तात्काळ श्वान पथकासह अंगुली मुद्रापथकाला पाचारण करुन घटनास्थळाची पाहणी केली. सदरचा पुढील तपास सपोनि नरवाडे करीत आहेत. या चोरीच्या घटनेमुळे या ग्रामस्थ भयभीत झाले असून, कड्यातील पोलिसांनी हातात काठी व शिट्टी घेऊन गस्त करण्याऐवजी शस्त्र घेऊन रात्रीची गस्त वाढवावी. अशी मागणी होत आहे.

**कार्यकर्त्याच्या कुटुंबाला**

पदाधिकाऱ्यां समवेत आगे परिवाराची त्यांच्या घरी जावून भेट घेतली व ना. पंकजाताईंनी दिलेली मदत सुपूर्द केली. यावेळी ना. पंकजाताईंनी दूरध्वनीवरून आगे यांचे आई वडील तसेच पत्नी व लहान मुलीशी संवाद साधत त्यांना धीर दिला व सांत्वन केले. पत्नीला नोकरी देण्याचा शब्द देत तुमच्या काळजी करू नका, मी तुमच्या पाठिशी सदैव राहील असा धीर त्यांनी यावेळी दिला. ना. पंकजाताईंनी दिलेल्या या मायेच्या आधाराने आगे परिवाराला अश्रू अनावर झाले होते.भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, तालुकाध्यक्ष अरूण राऊत, नवनाथ शिराळे, रामराव खेडकर, रामदास बडे, डॉ. अशोक तिडके, प्रकाश सुरवसे, श्रीकांत सानप आदींसह पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

**बाप-लेकावर प्राणघातक**

संभाजीनगर येथे हलविले गरजेचे आहे, त्यावर महादेव गायकवाड यांना संभाजीनगर येथे हलवले. तर मुलगा आशुतोष महादेव गायकवाड यांचे सिटी स्कैन करण्यात आले असुन त्याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती रात्रीच्या १०:१५वा.मिळाली आहे. प्रकरणी रात्री उशीरा वृत्त लिहिपर्यंत फिर्याद दाखल झाली नव्हती त्यामुळे सविस्तर वृत्त हाती आले नाही.

**धाराशिव पोलीसांची मोठी**

संशय असून तो माल कुठून आला व कशासाठी वापरला जाणार आहे याचा तपास सुरू आहे गाड्या व मुद्देमाल तपासणीसाठी सोलापूर येथे नेण्यात आल्या असून तपासणीनंतर पुढील कारवाई होणार आहे ही कारवाई नळदुर्ग जवळील फूलवाडि टोल नाका येथे केली आहे पोलीस अधीक्षक मा.संजय जाधव, अप्पर पोलीस अधीक्षक मा.श्रीमती शफकथ आमना, विभागीय अधिकारी डॉ. निलेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मा.विनोद इज्ञपवार यांच्या व नळदुर्ग पोलिसांच्या पथकाने ही मोठी कारवाई केली आहे.

**केवड सबस्टेशन गेले**

नमीता लोखंडे यांनी दीले होते परंतु अद्याप पर्यंत केवडचे सबस्टेशन गेले कुठे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे. तसेच आमदारा नमीता लोखंडे यांनी अनेक गावांमध्ये राजकारण केले आहे आमदारा नमीता लोखंडे महावितरण कंपनीच्या नावाखाली राजकारण करताना जनाची नव्हे तर मनाची तरी बाळगुन राजकारण करावे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले.

**धार्मिक युद्धाला सरन्यायाधीश**

भारताच्या सर्वोच्च न्यायाधीशांची नियुक्ती करतात. संसद या देशाचा कायदा बनवते. तुम्ही त्या संसदेला हुकूम देणार का, कोणत्या कायद्यात असे लिहिले आहे की, राष्ट्रपतींनी ३ महिन्यांत विधेयकावर निर्णय घ्यावा, याचा अर्थ असा की, तुम्ही या देशाला अराजकतेकडे घेऊन जाऊ इच्छिता, असा थेट आरोप सरन्यायाधीशांवर केला आहे. दुबे यांच्या वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.या अगोदर उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनीही काही दिवसांपूर्वी न्यायव्यवस्थेविरुद्ध कडक टीका केली होती. ते म्हणाले की, आपण अशी परिस्थिती निर्माण करू शकत नाही, जिथे तुम्ही भारताच्या राष्ट्रपतींना सूचना देत आहात. या सूचना कोणत्या आधारावर देत आहात, संविधनाच्या कलम १४५ (३) अंतर्गत तुम्हाला फक्त कायद्याचा अर्थ लावण्याचा अधिकार आहे. कलम १४२ हे लोकशाही शक्तीविरुद्ध एक अण्वस्त्र क्षेपणास्त्र बनले आहे.

**निवडणुकीच्या अनुषंगाने**

बजरंग बप्पा सोनवणे यांनी केले. तर कार्यकर्ता हा कोणत्याही पक्षासाठी महत्वाचा घटक असतो, याच एकदिलाने काम काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे संघटन म्हणजेच पक्ष असतो. निष्ठेने काम करणारांना पक्ष संधी देईल असे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के पाटील यांनी बोलतांना केले. परळी वैजनाथ येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयासमोर आयोजित कार्यकर्ता संवाद मेळाव्यात ते बोलत होते. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या परळी शहर आणि तालुका पदाधिकारी निवड आणि कार्यकर्ता संवाद मेळावा आज शनिवार दिनांक १९ एप्रिल रोजी घेण्यात आला. या मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ.संजीवनीताई देशमुख, ज्येष्ठ नेते फुलचंद कराड, राजेसाहेब देशमुख, कार्यक्रमाचे संयोजक आणि पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्यासह परळी शहरातील अणि ग्रामीण भागातील अनेकांची उपस्थिती होती.परळी शहर आणि तालुका कार्यकर्ता संवाद आणि पक्षाचे आगामी पदाधिकारी निवड यानुषंगाने यावर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. तळागाळातील सर्वसामान्य माणूस जेव्हा निस्वार्थपणे आपल्या बैठकीला येतो तेंव्हा ती त्याची निष्ठा असते, त्याचे आपल्यावर, आपल्या पक्षावर प्रेम असते म्हणून आपण लोकप्रतिनिधी असतो. हे लक्षात घेऊन पक्षाच्या प्रत्येकाने काम करावे अशा सूचना बजरंग बप्पा सोनवणे यांनी दिल्या.

## पान सहा वरून

**एमबीबीएस पदवी परिक्षा**

सायास कारण अभ्यास तुका म्हणे ! या अभंगाप्रमाणे तंतोतंत तिने आपल्या अभ्यासाच्या जोरावर हे यश मिळवले आहे याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. आई जिल्हा परिषद शिक्षिका आणि वडील शिक्षणप्रेमी असल्याकारणाने शिक्षणाचा वसा तिला घरातच मिळाला. सर्व सुख सुविधा घरामध्ये असताना सुद्धा इतर मुली किंवा मुले परिश्रम घेताना मागेपुढे पाहतात परंतु असे न करता सातत्य आणि परिश्रमाच्या जोरावर जगात काहीही मिळवणे शक्य आहे याचे ज्वलंत उदाहरण कु. डॉ. पायलने समाजापुढे ठेवले आहे.

**विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा**

डॉ ओमप्रकाश शेटे यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.बाल चिमुकल्या विद्यार्थीनी विविध सामाजिक , धार्मिक, लोकप्रिय गितांवर या प्रसंगी नृत्य सादर करित उपस्थितांची मने जिंकली.वैष्णवी थावरे, अभिजीत थावरे,सुरज थावरे,अजय थावरे, ऋषीकेश थावरे,प्राचार्या दिपाली स्वामी,साक्षी रांजवन,सुरेखा डिग्रसकर, अश्विनी कस्तुरे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

**ग्रामसेवक निघाला भलताच**

नाही ,साधे जन्म किंव्हा मृत्यू प्रमाण घ्यावयाचे असेल तर दोन ते तीन हजार रुपये द्यावे लागते ही वस्तुस्थिती आहे याकडे,सरपंच आणि ग्रामविकास अधिकारी यांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष आहे.याचे प्रत्यक्ष उदाऱ्हरण द्यायचे असेल तर रेकॉर्ड तपासणी करावे तेव्हा सर्व समोर येईल ही वस्तुस्थिती आहे .परंतु याकडे ना सरपंच लक्ष देतो ना ग्रामविकास अधिकारी ना पंचायत समितीचे अधिकारी त्यामुळे गटविकास अधिकारी यांनी सर्व रेकॉर्ड तपासावे अशी मागणी अनेक वेळा ग्रामपंचायत सदस्य यांच्या सह सामान्य जनतेकडून होत असून बदली झालेले ग्रामविकास अधिकारी यांना बदलीचे आदेश देवून ही चार्ज दिला नसल्याने शिस्तभंगाची कार्यवाही होते की नाही हे पहावे लागेल

**रस्त्याची चाळण,प्रवाशी**

मोठमोठे खड्डे निर्माण झाले आहेत. पावसाळ्यात या रस्त्यावरील डांबर पूर्णपणे उखडले गेले असून, त्यामध्ये वाहन अडकून अपघाताचे प्रमाणही वाढले आहे. या रस्त्यावरून प्रवास करताना विद्यार्थ्यांना वेळेवर शाळेत पोहोचणे अवघड झाले आहे. रुग्णवाहिकेला उशीर होण्याचे प्रकारही समोर आले आहेत.स्थानिक नागरिक आणि प्रवाशांनी प्रशासनाकडे रस्ता तातडीने दुरुस्त करण्याची जोरदार मागणी केली आहे.रस्ता हा आमच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. याकडे जर वेळेत लक्ष न दिल्यास आम्हाला आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागेल, असा इशारा ग्रामस्थ व प्रवाशांनी दिला आहे.या गंभीर स्थितीकडे प्रशासन लक्ष देऊन त्वरित दुरुस्तीचे काम हाती घेईल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत

**चिंचोली माळीत खुलेआम**

घेऊन सुस्त झाले का कारण चिंचोली माळी येथील तलाठी कार्यालय असो किंवा महावितरण केंद्र आहे तसेच छत्रपती संभाजी महाराज चौक आहे अशा ठिकाणी खुलेआम दारु विक्री करणाऱ्या धाब्यावर कार्यवाही केली म्हणजे तहसीलदार, पोलीस प्रशासन हप्ता घेऊन सुस्त आहे असे नागरिकांन मध्ये चर्चा सत्र सुरू झाले आहे तसेच अवैध दारू अशा ठिकाणी विकली जाते की जेथे लहान मुल मुली येतात जातात व त्यांचा परीनाम नागरिकांना भोगावा लागत आहे.

**खवतडचा आका विष्णू**

जवळ सुध्दा केले नाही पाहिजे हा आतापर्यंत मनत होता सुशांत खवतडचा आणि माझा काय संबंध नाही पण आता खरं सांगतोय हि जलजिवनची कामे माझीच आहेत मग तुम्हीच सांगा या दहा गावांत जलजिवन मध्ये भ्रष्टाचार करणार कोण कडक उन्हाळा चालू आहे जर आता लोकांना पाणी पिण्यासाठी मिळाले नाही तर परत पाऊस पडल्यावर या योजनेचा काय फायदा जलजिवनचे अर्धेच कामे केली आहे सुशांत खवतड व आका यांनी जवळपास सगळ्याच गावाची बीले उचलली आहेत दहा गावांमध्ये त्या गुत्तेदारानी व आकांनी जलजिवनच्या कामात कोट्यवधी रुपयांचा निधी हडपला आहे या आकाला जनता धडा शिकवील्या शांत बसणार नाही.

**डीजेच्या कर्कश आवाजाचा**

आवाजापुढे आजचा तरुण बाबासाहेबांच्या जयघोष करणाऱ्या घोषणा विसरून गेला आहे. हे घातक असून बाबासाहेबांच्या जयंतीचा उद्देशच नाहीसा होत आहे. यावर चिंतन मनन होणं अत्यंत गरजेचे आहे मिरवणुकीचा बिभत्सपणा जाऊन मिरवणुकीमध्ये सुमधुर वाद्य यायला हवे असे मत मिलिंद घाडगे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी हनुमंत जी वाघमारे, प्रजावतीताई कांबळे,डॉक्टर स्वप्नील महाळंगीकर, यशपाल बचाटे यांनीही आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भिम शाहीर प्रबोधनकार राहुल जी सूर्यवंशी सर यांनी तर आभार गौतम आदमाने यांनी मांडले. कार्यक्रम करण्यासाठी संजीवन पैठणी, भगवान बनसोडे, आकाश तूप समुद्रे, दयानंद बनसोडे, सुयोग किरवले, विद्याकर हरभडे, सुनील किरवले, पंढरीनाथ आरबडे, अशोक वावळे, विमलताई शिंदे, कविताताई पैठणे, संगीतताताई सूर्यवंशी, रेखाताई वाघमारे, इंदुताई हरबडे, पंकजाताई किरवले इत्यादींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला महिला, पुरुष, बालक बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# बदलापुरातील प्लॅटफॉर्म क्र. १ होणार कायमस्वरूपी बंद

## मध्य रेल्वेचा तुघलकी निर्णय

◆ बदलापूर (प्रतिनिधी) :

जानेवारी २०२४ मध्ये मध्य रेल्वे प्रशासनाने होम प्लॅटफॉर्म बंद करण्याचा घेतलेल्या निर्णयाला स्थगिती दिली होती. लोकसभा निवडणुकांच्या आधी मध्य रेल्वे प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाला बदलापुरातील रेल्वे प्रवाशांनी केलेल्या कडाडून विरोधानंतर तत्कालीन खासदार आणि माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनीही विरोध केल्यामुळे बदलापूर रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक एक बंद करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने तात्पुरता स्थगित केला होता. आता मात्र रेल्वे प्रशासनाने हा तुघलकी निर्णय पुन्हा एकदा जाहीर करून शनिवारी आणि रविवारी रात्री यासाठी मेगाब्लॉक जाहीर केला आहे. याबाबत प्रवाशांमध्ये कुठेही वाच्यता होऊ नये, म्हणून अत्यंत गोपनीयता पाळण्यात आली आहे. सध्या अस्तित्वात असलेला प्लॅटफॉर्म क्रमांक एक हा कायमस्वरूपी रेलिंग लावून बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे बदलापूर पूर्वेकडे राहणाऱ्या प्रवाशांना मोठी फरपट होणार आहे. इतकच नाही, तर पूर्वेकडील प्रवाशांना पश्चिमेकडे जाऊन मग प्लॅटफॉर्म क्रमांक एकवरून गाडी पकडावी लागणार आहे. मध्य रेल्वे प्रशासनाने बदलापूरकरांची केलेली ही शुद्ध फसवणूक असून होम प्लॅटफॉर्मच्या नावाखाली बदलापूरकरांना मध्य रेल्वेच्या या प्रशासना विरोधात बदलापुरातील रेल्वे प्रवासी अत्यंत आक्रमक भूमिका घेण्याच्या मनस्थितीत आहेत.

होम प्लेटफॉर्म हा एक नंबर जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे कर्जत आणि खोपोलीला जाणाऱ्या प्रवाशांना याचा मोठा फटका सहन करावा लागणार आहे. कारण कर्जत खोपोलीला जाणारे अनेक प्रवासी हे बदलापूर गाडीने बदलापूर स्थानकावर येऊन त्याच स्थानकावर उतरून नंतर कर्जत गाडी पकडत होते. आता मात्र त्यांना प्लॅटफॉर्म क्रमांक एक वर उतरून सध्याच्या होम प्लॅटफॉर्मवर उतरून जिन्याने पुन्हा या दुसऱ्या म्हणजे सध्या असलेल्या प्लॅटफॉर्म क्रमांक दोनवर गाडी पकडण्यासाठी यावे लागणार आहे. यामध्ये लहान मुले, गरोदर स्त्रिया, ज्येष्ठ नागरिक यांना याचा मोठा फटका सहन करावा लागणार आहे. त्याचबरोबर बदलापूर ते कर्जत खोपोली आणि पुण्याकडे जाणाऱ्या प्रवाशांना याचा मोठा फटका सहन करावा लागणार आहे. होम प्लॅटफॉर्मचे काम लवकरच पूर्ण होणार असल्याने सध्या या ठिकाणी प्रवाशांना दिलासा मिळत असतानाच बदलापूरकरांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार मध्य रेल्वेने केल्याची भावना बदलापुरातील संतप्त प्रवासी व्यक्त करत आहेत.




### अपुऱ्या जागेमुळे मोठी गर्दी

जे प्रवासी पूर्वी प्लॅटफॉर्म क्रमांक एक आणि होम प्लॅटफॉर्मवरून मुंबई दिशेला जात होते. त्या सर्व प्रवाशांना आता होम प्लॅटफॉर्मवर जाऊन मुंबई सीएसएमटीच्या दिशेला गाडी पकडावी लागणार आहे. अर्धवट अवस्थेत असलेली काम आणि होम प्लॅटफॉर्मची अपुरी जागा यामुळे प्रवाशांची मोठी गर्दी या प्लॅटफॉर्मवर होण्याची शक्यता आहे. तसेच अनेक वेळा मुंबई सीएसएमटीला जाणारी गाडी ही प्लॅटफॉर्म क्रमांक दोनवर थांबविले जाते. त्यामुळे जर असा प्रकार घडल्यास मोठा गडबड गोंधळ होऊन जीवितहानी होण्याची ही शक्यता नाकारता येत नाही. तसेच ज्या प्रवाशांना वांगणी ते कर्जत पुणे किंवा खोपोलीपर्यंत प्रवास करायचा आहे ते अनेक प्रवासी बदलापूर स्थानकात उतरत होते. त्यांनाही आता कर्जत गाडी पकडण्यासाठी संपूर्ण प्लॅटफॉर्मवर ब्रीज चढून प्लॅटफॉर्म क्रमांक दोनवर यावे लागणार आहे.

### प्रवासी संताप व्यक्त

रेल्वे प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मुंबईमध्ये बसून निर्णय घेताना स्थानिक परिस्थितीचा कोणताही विचार न करता थेट बॅरिकेटिंगचे काम सुरू करून बदलापुरातील रेल्वे प्रवाशांना आणि स्थानिक लोकप्रतिनिधींना जुमानत नसल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. बदलापुरात आधीच रेल्वे गाड्यांची संख्या कमी आहे. त्यात सुविधांची वाणवा असताना मध्य रेल्वे प्रशासन ठेकेदारांचे तळे उचलण्यासाठी प्रवाशांना वेठीस धरत असल्याने बदलापुरातील प्रवासी संताप व्यक्त करत आहेत. 'भीक नको, पण कुत्रा आवर', असे या कामाच्या निमित्ताने म्हणण्याची वेळ आता बदलापूरकरांवर आली आहे.



## साहित्य मंचाच्या वर्धापन दिनाला साहित्यिकांची मांदियाळी

**भाईंदर :** दैवज्ञ साहित्य मंचचा ३५ वा तसेच दैवज्ञ समाजोन्नती परिषदेच्या ११७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाला मुंबई, पुणे, रायगड येथील साहित्यिकांनी उपस्थित राहून रंगत आणली. त्यात अभिजात अखिल भारतीय दैसपच्या ११७ व्या आणि दैवज्ञ साहित्य मंचचा ३५ वा वर्धापन दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात पुण्याहून ज्येष्ठ साहित्यिक प्रा. श्याम भुर्के, रायगडवरून साहित्यिका ॲड. प्रतिभा पोतदार, मुंबईतील ज्येष्ठ साहित्यिक, अनेक पुस्तकांचे लेखक रवींद्र माहिमकर, व्यवसायाने हृदयरोग तज्ज्ञ असूनही अनेक पुस्तके, कथा, मुंबईत मराठी भाषेत नामफलक लावण्याचा प्रस्ताव मंजूर करणारे ॲड. मनमोहन चोणकर यांच्यासह अनेकजण कार्यक्रमात सहभागी झाले होते.

## वेचक

### कल्याण पश्चिमेसह टिटवाळा परिसरात पाणीपुरवठा बंद

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मोहिली जलशुद्धीकरण केंद्र येथील रॉ वॉटर व शुद्ध पाण्याच्या मुख्य जलवाहिनीवर फ्लो मीटर बसविण्याकरिता मंगळवार दि. २२ एप्रिल रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ९ तास महापालिकेच्या मोहिली जलशुद्धीकरण केंद्रामधून महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण ग्रामिण विभाग मांडा-टिटवाळा, वडवली, आंबिवली, शहाड, अटाळी व कल्याण ग्रामीण विभागातील इतर गावे व कल्याण पश्चिम "ब" प्रभाग क्षेत्रातील मिलिंद नगर, योगिधाम, चिकनघर, बिर्ला कॉलेज, मुरबाड रोड परिसर येथील परिसरास होणारा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तरी या परिसरातील नागरीकांनी पाण्याचा साठा करून महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन केडीएमसी पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी केले आहे.

### दिवसाढवळ्या जुगार-मटक्याचे अड्डे तेजीत

**डोंबिवली :** कल्याण-डोंबिवलीतील अनधिकृत धंदे बंद करण्यासाठी पोलिसांनी जोरदार मोहीम सुरू केली आहे. शहराच्या विविध भागात पोलिसांची गस्ती पथके जुगार, मटके, दारू अड्डे, अमली पदार्थ तस्करी अड्ड्यांवर कारवाई करत आहेत. मात्र डोंबिवली पूर्वेतील रामनगर पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर, तसेच मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील टाटा पॉवर नाका भागात दिवसाढवळ्या जुगार-मटक्याचे तेजीत अड्डे चालविले जात आहेत.

## भिवंडीत वाणिज्य कर न भरता थाटले विवाह हॉल

**भिवंडी :** भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात विवाह सोहळे साजरे करण्यासाठी मोकळ्या मैदानात लग्न सोहळ्यासाठी खासगी मालकांकडून लग्नाचे हॉल बनवले गेलेले आहेत; परंतु त्यांच्याकडून कोणताही वाणिज्य कर पालिकेकडे भरला जात नसल्याने पालिकेचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान होत आहे. विशेष म्हणजे या लग्न हॉल चालकांकडून परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून काळजी घेणे आवश्यक आहे. शहरात अनेक विवाह हॉल मोकळ्या मैदानात खासगी जमीन मालकांनी थाटले आहेत. हे विवाह हॉल शहरातील नागरिकांना लग्न सोहळ्यासाठी उपलब्ध करून देण्यासाठी भाड्यापोटी पन्नास हजार ते एक लाख रुपये घेत आहेत; परंतु कोणताही कर तिजोरीत भरला जात नाही.

## इमारती प्रतिनिधींनी घेतली आ. केळकर यांची भेट

# क्लस्टरसाठी अधिकाऱ्यांऐवजी बिल्डरांची पडू लागली धाड



◆ ठाणे (प्रतिनिधी) :

क्लस्टर योजनेची इमारत पूर्ण होऊन रहिवासी राहण्यास गेल्याचे एकही उदाहरण पाहायला मिळत नसल्याने रहिवाशांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. अशात नियोजित क्लस्टरच्या परिसरात अधिकाऱ्यांच्या आधी बिल्डर आणि त्यांचे सहकारी घुसू लागल्याने रहिवाशांमध्ये संशय आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत ठाण्यातील १९ इमारतींच्या रहिवासी प्रतिनिधींनी आमदार संजय केळकर, क्लस्टर आणि पालिका अधिकाऱ्यांची भेट घेत संभ्रम दूर केला. ठाणे शहरात मोडकळीस आलेल्या धोकादायक आणि अनधिकृत इमारतींचा सामूहिक विकास करण्यासाठी राज्य शासनाने क्लस्टर योजनाबाबती.

त्यानुसार ठाणे शहरात ४४ आराखडे तयार करण्यात आले आहे. संजय किसननगर येथे क्लस्टरचे काम सुरू असून अन्य भागात अद्याप योजनेबाबत संभ्रम असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. ज्या भागात योजना राबवण्यात येणार आहे, तेथे बिल्डर आणि त्यांचे सहकारी रहिवाशांशी संपर्क साधत आहेत. खासगी व्यक्ती क्लस्टरबाबत पुढाकार घेत असल्याने अनेक भागात रहिवाशांमध्ये या योजनेबाबत गोंधळ निर्माण झाला आहे. हा गोंधळ दूर करण्यासाठी सिद्धेश्वर तलाव, हंसनगर भागातील ४० वर्षे जुन्या १९ अनधिकृत इमारतींच्या प्रतिनिधींनी आमदार संजय केळकर यांची भेट घेतली. यावेळी बैठकीस क्लस्टर विभागाचे अधिकारी आणि ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त देखील उपस्थित होते.

### रहिवाशांमध्ये संभ्रमाचे वातावरण

याबाबत बोलताना आमदार संजय केळकर यांनी क्लस्टर विभागाच्या हलगर्जीपणाबत नाराजी व्यक्त केली. एखाद्या परिसरात क्लस्टर योजना नियोजित असेल, तर त्या ठिकाणी आधी क्लस्टर आणि ठाणे महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी जाऊन रहिवाशांशी संवाद साधायला हवा. योजनेचे माहिती पत्रक देऊन योजना कशा पद्धतीने राबवण्यात येईल, रहिवाशांचे हंगामी पुनर्वसन, त्यांना मिळणारी घरे, क्षेत्रफळ, सोयी-सुविधा याबाबतची माहिती त्यांनी रहिवाशांना द्यायला हवी.

मात्र तसे न होता काही खासगी व्यक्ती, बिल्डर आणि त्यांचे सहकारी त्या विभागात जात असून रहिवाशांशी संपर्क साधत आहेत, त्यामुळे या योजनेबाबतची विश्वासार्हता संपत असल्याचे श्री. केळकर यांनी सांगितले.

### संभ्रमाचे वातावरण

४० हून अधिक प्रतिनिधींना थेट क्लस्टर आणि महापालिका अधिकाऱ्यांशी चर्चा करता आल्याने त्यांच्यातील गोंधळ आणि संभ्रम दूर झाला. रहिवाशांमध्ये या योजनेबाबत काही संभ्रम असेल, तर त्यांनी थेट या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. या कामी क्लस्टरचे प्राधिकृत अधिकारी नेमण्यात आले असून ते याबाबत रहिवाशांना अधिकृत माहिती देतील, असेही श्री. केळकर यांनी सांगितले.

## कल्याण न्यायालयाच्या प्रांगणात वकिलांचे रक्तदान

◆ कल्याण (वार्ताहर) :

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रक्तदात्यांच्या सेवाभावी वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि गरजू रुग्णांना आवश्यक तेवढा रक्तसाठा उपलब्ध व्हावा यासाठी कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटना आणि गायकवाड फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी कल्याण जिल्हा न्यायालय प्रांगण, कल्याण येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये सहभागी होऊन कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयातील वकील बांधवांनी आपले सामाजिक कर्तव्य पार पाडले.



रक्तदान शिबिराचा प्रारंभ कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयातील जिल्हा न्यायाधीश इनामदार, अस्तुरकर, हरणे, मुळे आणि मोटे यांनी आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून रक्तदानाला प्रारंभ करण्यात आला. यावेळी कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रकाश जगताप, उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील, सचिव ॲड. चंद्रकांत वाघमारे, सहसचिव ॲड. सुशील धनगर, सदस्य ॲड. प्रदीप बावसकर, ॲड. मनिषा धिवरे आणि अध्यक्ष ॲड. रोहन गायकवाड, ॲड. विशाल केदार यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. या शिबिरात ३७ युनिट रक्तदान करण्यात आले. २०० पेक्षा जास्त नागरिकांचे डोळे तपासणी करण्यात आले. फुल बॉडी चेकअप मोफत करण्यात आले.

## नदीतील जलपर्णी काढण्याचे काम सुरू

◆ डोंबिवली (वार्ताहर) :

ठाणे जिल्ह्यातील ५० लाखांहून अधिक नागरिकांना पाणीपुरवठा करणारी उल्हास नदी मागील काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर प्रदूषित होऊ लागली आहे. कारखान्यांतून सोडले जाणारे रसायनमिश्रीत सांडपाणीमुळे नदीत वेगाने वाढत असलेली जलपर्णी दिसत आहे. कल्याणकर संस्थेने आंदोलनाचे खड्ग उपसताच शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार शुक्रवारपासून उल्हास नदीतील जलपर्णी काढण्याचे काम सुरू केले आहे. जलपर्णी काढण्यासाठी स्वयंचलित मशीनचा वापर करण्यात येत असून ही जलपर्णी येत्या काही दिवसांतच उल्हास नदीतून हद्दपार होईल, असे सुरू केलेल्या कामावरून दिसून येते.

बदलापूर, अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण, तसेच ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण परिसरातील गावांचे सांडपाणी थेट उल्हास नदीत सोडले जाते. त्यामुळे उल्हास नदीचे अनेक ठिकाणी नाल्यात रूपांतर झाले आहे. काही वर्षांपासून नदीच्या पात्रात जलपर्णी फोफावत आहे. यावर्षी एक महिन्यापासून सतत आपटी, रायता, काम्बा, म्हारळ, सिमा रिसोर्ट, रिजेंसी एंटीलिया ते मोहन्यातील एनआरसी बंधाऱ्यापर्यंत उल्हास नदीच्या पृष्ठभागावर अवाढव्य जलपर्णी पसरत चालली आहे. मोहिली व मोहना बंधारा पाणी उपसा केंद्रात जलपर्णी अडकत आहे.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ४ लाख ७५ हजारांची फसवणूक

### आंबिवलीतील खासगी रुग्णालयाचा पर्दाफाश

◆ कल्याण (वार्ताहर) :

मुख्यमंत्री सहाय्यता निधीसारख्या गरजूंना मदतीचा हात देणाऱ्या शासकीय योजनेचा गैरवापर करत, आंबिवलीतील एका खासगी रुग्णालयाने तब्बल चार लाख पंच्याहत्तर हजार रुपयांचा निधी बनावट कागदपत्रांच्या आधारे उकळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी गणपती मल्टिस्पेशालिस्ट रुग्णालय आणि त्यातील तीन डॉक्टरांविरोधात खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आर्थिक गुन्हे शाखेने या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी विभागाचे प्र. सहाय्यक संचालक देवानंद धनावडे यांनी १७ एप्रिल २०२५ रोजी खडकपाडा पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली आहे. राज्य सरकारच्या निधीचा गैरवापर होत असल्याची शंका निर्माण झाल्यानंतर, आर्थिक गुन्हे शाखेने सखोल तपास सुरू केला होता. तपासात धक्कादायक बाब उघडकीस आली की, डॉ. आनंदुर्ग ढोनी, डॉ. प्रदीप पाटील आणि ईश्वर पवार (रा. धुळे) या डॉक्टरांनी आपसात संगनमत करून, २६ मे २०२३ ते १० जुलै २०२३ या कालावधीत एकूण १३ गरीब रुग्ण दाखल नसतानाही, त्यांच्यावर उपचार आणि शस्त्रक्रिया झाल्याचे दाखवून बनावट कागदपत्र तयार केली. या कागदपत्रांच्या आधारे राज्य शासनाकडून मिळणाऱ्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीअंतर्गत तब्बल ४ लाख ७५ हजारांचा निधी उकळण्यात आला. या बनावट प्रकरणाची माहिती मिळताच मुख्यमंत्री सहाय्यता निधी विभागाने याची चौकशी सुरू केली, आणि चौकशी अहवाल आर्थिक गुन्हे शाखेकडे सुपूर्द करण्यात आला. आर्थिक गुन्हे शाखेने संपूर्ण प्रकरणाची खातरजमा करून, सदर रुग्णालयाविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

## शिवसेना सोशल मीडिया उपराज्यप्रमुख पदी प्रतीक शर्मा यांच्यावर जबाबदारी



◆ कल्याण (वार्ताहर) :

शिवसेना पक्षाच्या बांधणीसाठी एकनाथ शिंदे यांनी कंबर कसली असून सर्वच माध्यमातून पक्षाला बळकटी देण्याचा प्रयत्न सुरू आहे. सोशल मीडीयाच्या माध्यमातून पक्ष तळागाळात पोहोचवण्यासाठी एकनाथ शिंदेंनी सोशल मीडीयाच्या उप राज्यप्रमुखपदी सध्या पक्षाचा सोशल मीडीया सांभाळणारे प्रतिक शर्मा यांची नियुक्ती केली आहे. शिवसेनेचे मुख्य नेते आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत गेल्या अनेक दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर पक्षप्रवेश होत आहेत. राज्यभरातून विविध पक्षाचे नेते, माजी आमदार, माजी खासदार, नगरसेवक, द सदस्यांपासून सरपंचांपर्यंत अनेकांनी शिंदेंच्या नेतृत्वाखाली शिवसेनेते प्रवेश केला.

## श्री गजानन विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे आयोजन

◆ कल्याण (वार्ताहर) :

"पुन्हा एकदा शाळेच्या आठवणीत..." हे ब्रीद डोळ्यांसमोर ठेवून कल्याण पश्चिमेतील श्री गजानन विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या मनोमिलन मेळाव्याचे आयोजन रविवार दि. २७ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता श्री गजानन विद्यालय याठिकाणी करण्यात आले आहे. बालपणाच्या पायवाटांवरून चालत पुन्हा शाळेच्या उंबरठ्यावर पोहोचण्याचा हा क्षण अक्षर ओळख देणाऱ्या वर्गखोल्या, खोड्यांनी भरलेले दिवस, आणि आईसारखी माया करणाऱ्या 'मोठ्या बाई' प्रतिभा भालेराव यांचं प्रेमळ शिक्षण या साऱ्या आठवणींना उजाळा देण्यासाठी, श्री गजानन विद्यालयातील माजी विद्यार्थी एकत्र येणार आहेत. २७ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता, कल्याणच्या श्री गजानन विद्यालयात एक भावस्पर्शी स्नेहमेळावा आयोजित केला आहे. या दिवशी, शाळेची वाटचाल, मोठ्या बाईंचा समर्पित प्रवास, आणि विद्यार्थ्यांच्या अंतःकरणात कोरलेले त्या क्षणांचे स्मरण उत्सवाच्या रूपात साजरे होणार आहे.

शिशु विहार शाळेची स्थापना १९६६ साली 'मोठ्या बाईंच्या' हस्ते केवळ ३-४ विद्यार्थ्यांपासून झाली. १९९० पर्यंत ती बदलापूरकर चाळीत कार्यरत होती. १९९० मध्ये शाळेचं नाव 'श्री गजानन विद्यालय' असं ठरलं आणि इथूनच १० वीपर्यंतचे वर्ग सुरू झाले. २००८ मध्ये शाळेला 'आदर्श शाळा' म्हणून सन्मान मिळाला आणि त्यानंतर मोठ्या बाईंसह शाळेने अनेक पुरस्कार पटकावले. या शाळेतून शिकून गेलेले विद्यार्थी आज जगभर विखुरले गेले असले तरी, शाळेच्या आणि बाईंच्या आठवणींनी ते आजही बांधले गेले आहेत.

त्याच प्रेमातून हे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आलं आहे. हा केवळ एक कार्यक्रम नाही, तर त्या माउलीसाठीचा सन्मान आहे, जिने आपल्या चुका दाखवून दिल्या, कान पकडून ओरडल्या, आणि जीवनाचे खरे धडे शिकवले. म्हणूनच, शाळेच्या पटांगणात पुन्हा एकदा बालपण दरवळणार आहे.

जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी, त्या प्रेमळ शिक्षिकेला वंदन करण्यासाठी, आणि आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात अमूल्य ठरणाऱ्या शाळेचा गौरव करण्यासाठी सर्व माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन माजी विद्यार्थ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## शहापुरातील पाणीटंचाईला भातसा नदीचा आधार

**शहापूर :** शहापूर तालुक्यात दरवर्षीप्रमाणे भीषण पाणीटंचाई सुरू असून टंचाईवर मात करण्यासाठी केवळ सापगाव जवळील एकच भातसा नदीचा आधार असल्याने टँकर चालकांना लांबचा प्रवास करावा लागत आहे. तर फेऱ्या देखील कमी लागत आहेत. धरणांचा तालुका अशी ओळख असलेल्या शहापूर तालुक्यात भीषण पाणीटंचाई असून ११० ग्रामपंचायत हद्दीतील बहुतांशी नागरिकांना टंचाईचा सामना करावा लागतो. सद्यस्थितीत २७ गावे आणि १०८ पाडे मिळून १३५ गावपाड्यांना ३७ टँकरने दररोज सापगाव जवळील भातसा नदी याठिकाणाहून पाणी पुरवठा करावा लागत आहे. आणि त्यामुळे पाणीसमस्या वाढणार आहे.

## मध्य रेल्वेच्या दक्षता पथकाकडून बनावट आरक्षण तिकिटांचा पर्दाफाश

◆ कल्याण (वार्ताहर) :

मध्य रेल्वेच्या दक्षता पथकाने बुधवारी रात्री कुशीनगर एक्स्प्रेसवर छापा टाकून मोठ्या प्रमाणात बनावट आरक्षण तिकिटांचा पर्दाफाश केला. दक्षता पथकाच्या अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, कुशीनगर एक्स्प्रेसच्या दोन एसी डब्यांमध्ये १६ डुप्लिकेट तिकिटे आढळून आली, ज्यामध्ये ६४ प्रवासी प्रवास करत होते. मिळालेल्या माहितीनुसार, लोकमान्य टिळक टर्मिनसवरून गोरखपूरला निघालेल्या कुशीनगर एक्स्प्रेसवर दक्षता पथकाने छापा टाकला. एलटीटी ते आगतपुरी दरम्यान एसी कोच बी१ आणि बी८ मध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या ताब्यातून १६ डुप्लिकेट तिकिटे जप्त करण्यात आली आहेत. या तिकिटांवर ६४ प्रवासी प्रवास करत होते. नियमानुसार दक्षता पथकाने संबंधित प्रवाशांकडून १ लाख २० हजार रुपयांचा दंड वसूल केला. डुप्लिकेट तत्काळ तिकिटे राजस्थान, बिहार आणि उत्तर प्रदेशमधून जारी करण्यात आली होती. ही तिकिटे मुंबईतील भायखळा, कुर्ला आणि गोविंद येथे छापण्यात आली होती.

तपासादरम्यान काही तिकिटे व्हीआयपी कोट्यातूनही कन्फर्म झाल्याचे समोर आले आहे. बनावट तिकिटांसह पकडण्यात आलेले बहुतांश प्रवासी गोरखपूर आणि बस्ती येथे जात होते. याबाबत दक्षता पथकातील अधिकाऱ्याने सांगितले की, उन्हाळ्याच्या सुट्टीत विशेष गाड्या चालवल्या जात आहेत.

## संस्थेमध्ये वाढवलेल्या विविध कलागुणांचे सादरीकरण

# सन्मान समारंभात आर्य गुरुकुल विद्यार्थ्यांचा शैक्षणिक उत्कृष्टतेचा प्रवास

◆ कल्याण (वार्ताहर) :

आर्य गुरुकुल, वरिष्ठ माध्यमिक विद्यालयाचा प्रतिष्ठित सन्मान सोहळा शनिवारी नांदिवली, कल्याण कॅम्पस येथील बहुउद्देशीय हॉलमध्ये आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम संपूर्ण शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या शैक्षणिक आणि सह-शैक्षणिक उत्कृष्टतेचा एक भव्य उत्सव होता. या समारंभाला प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. दिनेश गुप्ता, प्रख्यात प्रेरक वक्ते,



कार्यक्रमाला खूप मोलाची आणि प्रेरणा मिळाली. हा समारंभ आर्य दोन्ही क्षेत्रांतील सातत्यपूर्ण प्रयत्न, शिस्त आणि यश ओळखणे आहे. कार्यक्रमाने संस्थेमध्ये वाढवलेल्या विविध कलागुणांचे प्रदर्शन केले. यावेळी बोलताना प्राचार्य राधामणी अय्यर यांनी व्यक्त केले.

"आर्य गुरुकुलमध्ये, आमचा असा विश्वास आहे की, शिक्षण हे केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित नाही. हा समारंभ आमच्या सर्वांगीण दृष्टिकोनाचा पुरावा आहे जिथे प्रत्येक मुलाच्या क्षमतेचे मूल्यमापन करून उत्सव साजरा केला जातो." भरत मलिक, आर्यग्लोबल अध्यक्ष पुढे म्हणाले, "आम्हाला आमच्या प्रेरणा देतो.

हा केवळ एक पुरस्कार सोहळा नाही तो चारित्र्य, धैर्य आणि वचनबद्धतेचा उत्सव आहे." अभिमानी पालक, समर्पित शिक्षक आणि उत्साही विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या उत्साही उर्जेमध्ये योगदान दिले आणि हा एक संस्मरणीय प्रसंग बनला. पुरस्कार वितरण आणि प्रमुख पाहुण्यांच्या प्रेरक भाषणाने कार्यक्रमाचा समारोप झाला, ज्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या उद्देशाशी सत्य राहण्यासाठी आणि

## सोनसाखळी चोरणाऱ्या आरोपींना केली अटक

### वर्तक नगर पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

वर्तक नगर, यशोधन नगर येथे राहणाऱ्या वंदना माने आपल्या पतीसह सकाळी सहा वाजता मॉर्निंगवॉक करत असताना, दोन अनोळखी इसमांनी मोटारसायकल वरून येऊन जबरदस्तीने त्यांच्या गळ्यातील चैन चोरत असताना वंदना माने यांनी चोरट्याचा हाथ धरून विरोध केला असता चोरट्याने त्यांना धक्का देऊन खाली पाडले व त्यांच्या गळ्यातील चैन खेचून मोटारसायकल वरून पळून गेले, त्या बाबतची तक्रार वर्तकनगर पोलीस स्टेशन देण्यात आली आणि त्या



यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या व आरोपीच्या तपासासाठी पथक तयार केले, त्या प्रमाणे गुन्हे प्रकटी करण पथकाचे पोलीस उप निरीक्षक विठ्ठल चिंतामण आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तपासास सुरुवात केली. परिसरातील तांत्रिक करून त्यांना पळून जाण्याची संधी न देता मोठ्या शिताफिने यातील आरोपी जाफर युसूफ जाफरी, यांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबूल केले,या दोघांना अटक करून तपासादरम्यान त्यांच्याकडून या गुन्ह्यातील तसेच

# ईडीची टांगती तलवार...

डायरेक्टोरेट ऑफ इर्फोसमेन्ट (ईडी)ने मनी लॉड्रिंगच्या आरोपाखाली सोनिया गांधी व राहुल गांधी यांच्यावर न्यायालयात आरोपपत्र दाखल केले आणि देशभर काँग्रेस पक्षाने रस्त्यावर उतरून निदर्शने केली. गेल्या दहा वर्षांत ईडीने देशातील अनेक बड्या बड्या नेत्यांना जेलमध्ये पाठवले, ईडीच्या नोटिशीने अनेक दिग्गजांना घाम फोडला, ईडीचे पथक चौकशीला येताच भल्या भल्यांना कापरे भरले, पण आमच्या पक्षाच्या सर्वोच्च नेत्यांवर ईडीने कारवाई केली, हे काँग्रेस कार्यकर्त्यांना मान्य नाही असे दिसते. कायद्यापुढे सर्व समान आहेत असे म्हटले जाते, पण गांधी परिवार हा कायद्यापेक्षा मोठा आहे अशी समजूत काँग्रेस जनांची झालेली दिसते. आपण जर निर्दोष आहोत, आपण कोणतेही आर्थिक गैरव्यवहार केलेले नाहीत, आपण दोन हजार कोटींची नॅशनल हेराल्डची मालमत्ता काबीज करण्याचा प्रयत्न केलेला नाही अशी जर सोनिया व राहुल यांची ठाम भूमिका असेल, तर न्यायालयासमोर जायला त्यांना कशाची भीती वाटते? सोनिया गांधी व त्यांचे पुत्र राहुल हे सध्या जामिनावर आहेत. जर ईडीने दाखल केलेल्या खटल्यात त्यांच्यावरील आरोप सिद्ध झाले नाहीत, तर ते निर्दोष मुक्त होतील व काँग्रेस जनांना त्यांची विजयी मिरवणूक काढण्याची संधी मिळेल, पण न्यायालयात आरोपपत्र दाखल केले म्हणून काँग्रेसने देशभर रास्ता रोको आंदोलन कशासाठी चालवले आहे?



स्टेटलाइन
डॉ. सुकृत खांडेकर

ईडीने विशेष न्यायालयात दि. ९ एप्रिल रोजी आरोपपत्र दाखल केले व दि. २५ एप्रिल रोजी सुनावणी होणार आहे. हरियाणामध्ये तत्कालीन भूपिंदरसिंह हुड्डांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारने नॅशनल हेराल्ड वृत्तपत्र प्रसिद्ध करणाऱ्या असोसिएटेड जर्नल लिमिटेड (एजेएल) या कंपनीला पंचकुला येथे एक मौल्यवान भूखंडाचे पुर्नवितरण केले होते. भूखंड वाटपात मोठा आर्थिक गैरव्यवहार झाला म्हणून ईडीने सहा वर्षांपूर्वी त्या भूखंडावर जप्ती आणली होती. ईडीने केलेल्या तपासात असे आढळून आले की, एजेएलचे ९९ टक्के शेअर्स यंग इंडियन या खासगी कंपनीला हस्तांतरित झाले आहे. अवघ्या पन्नास लाखांत दोन हजार कोटींपेक्षा जास्त मालमत्ता हस्तांतरित झाल्याचे तपासात आढळून आले. यंग इंडियन या कंपनीचे सोनिया गांधी व राहुल गांधी यांच्याकडे प्रत्येकी ३८ टक्के शेअर्स आहेत. म्हणजेच आई व मुलाकडे मिळून या कंपनीचे ७६ टक्के शेअर्स आहेत. उर्वरीत २४ टक्के शेअर्स मोतीला वोरा, ऑस्कर फर्नांडिस व इतरांच्या नावावर आहेत. नफा न मिळवणारी चॅरिटेबल कंपनी म्हणून यंग इंडियनची नोंद आहे. आरोपपत्रात वोरा व फर्नांडिस हे गांधी परिवाराच्या निकटचे असल्याचा उल्लेख आहे. सन २०२२ मध्ये ईडीने सोनिया, राहुल, वोरा व फर्नांडिस यांना आर्थिक व्यवहाराच्या चौकशीसाठी बोलविले होते.

असोसिएटेड जर्नल लि. ची स्थापना पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १९३७ मध्ये केली. या कंपनीवर वर्षानुवर्षे काँग्रेस व गांधी परिवाराशी संबंधित नेत्यांची पदाधिकारी म्हणून वर्णी लागत असे. वोरा, फर्नांडिस यांच्या व्यतिरिक्त भूपिंदरसिंग हुड्डा यांचे पुत्र दीपेंद्रसिंग, सॅम पित्रोदा, दीपकभाई रतिलाल बबारिया, सुमन दुबे अशी काहींची नावे एजेएल कंपनीवर पदाधिकारी सांगता येतील.

पंचकुला सेक्टर ६ मध्ये हरियाणा पोलीस मुख्यालयासमोरच ३३६० चौरस मीटरचा भूखंड आहे. त्याच्या आजूबाजूला मोठ-मोठी निवासस्थाने, शासकीय इस्पितळ, हरियाणा शहरी विकास प्राधिकरणाचे कार्यालय (हुड्डा), हरियाणा राज्य औद्योगिक विकास महामंडळ, राज्य पणन महामंडळ तसेच वन विभागाचेही कार्यालय आहे. एजेएलला वितरीत केलेला भूखंड अतिशय मौल्यवान होता. बन्सीलाल राज्याचे मुख्यमंत्री असतानाच हा भूखंड एजेएल कंपनीला १९८२ मध्ये देण्यात आला होता. नियमानुसार दिलेल्या ठराविक मुदतीत एजेएलने त्यावर बांधकाम सुरू न केल्याने त्यावरचा हक्क संपुष्टात आला व तो भूखंड परत सरकारकडे गेला. कंपनीने हरियाणा नंतर सरकारकडे बराच प्रयत्न करूनही तो भूखंड परत मिळाला नाही. पुढे हुड्डा हरियाणाचे मुख्यमंत्री झाले व सहा महिन्यांतच हा मौल्यवान भूखंड परत मिळविण्यात एजेएल कंपनीला यश मिळाले. त्यावेळी मोतीलाल वोरा हे असोसिटेड जर्नलचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर होते. कंपनीला अवघ्या ६९ लाख ३९ हजार रुपयांत हा किमती भूखंड मिळाला. २३ वर्षांपूर्वी जो दर लावला होता (५९ लाख ३ हजार) तोच दर पुन्हा आकारण्यात आला, व त्यात व्याजाची रक्कम भर घालण्यात आली. बाजारभावाने याच भूखंडाची किंमत ६४ कोटी ९३ लाख रुपये होती, असे ईडीने म्हटले आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी केवळ दोन महिने अगोदर म्हणजेच १४ ऑगस्ट २०१४ रोजी या भूखंडावर उभारलेल्या चार मजली इमारतीला हरियाणा शहरी विकास प्राधिकरणाने ऑक्युपेशन सर्टिफिकेट दिले. मात्र या भूखंडाची सरकार दरबारी नोंद शासकीय कार्यालय अशीच आहे. हरियाणा विधी विभागाचा नकारात्मक अभिप्राय डावलून तत्कालीन काँग्रेसचे मुख्यमंत्री हुड्डा यांनी स्वेच्छा अधिकारात तो मौल्यवान भूखंड एजेएल कंपनीला द्यावा असा आदेश दिला. पंडित नेहरूंनी स्थापन केलेल्या या कंपनीला नवजीवन हे हिंदी भाषिक दैनिक सुरू करावयाचे आहे व सार्वजनिक हितासाठी संबंधित भूखंड कंपनीला देणे उचित ठरेल असे हुड्डा यांनी १७ ऑगस्ट २००५ रोजी दिलेल्या आदेशात म्हटले होते.









हरियाणात २६ ऑक्टोबर २०१४ रोजी मनोहरलाल खट्टर यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे सरकार स्थापन झाले व पंचकुलामधील मौल्यवान भूखंड पुन्हा एजेएल कंपनीला दिल्याप्रकरणी झालेल्या घोटाळ्याची चौकशी करण्याचे त्यांनी आदेश दिले. जून २०१६ मध्ये ईडीने तत्कालीन मुख्यमंत्री हुड्डा यांच्या विरोधात भूखंड वितरणात सरकारचे मोठे आर्थिक नुकसान झाले म्हणून मनी लॉड्रिंगचा ठपका ठेवला. भूखंड घोटाळ्याची सखोल चौकशी करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री खट्टर यांनी सीबीआयकडे चौकशी सोपवली. एप्रिल २०१७ मध्ये सीबीआयने हुड्डा व इतरांवर सत्तेचा गैरवापर व आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. हुड्डा यांनी आदेश दिला तेव्हा ते मुख्यमंत्री होते म्हणून एफआयआरमध्ये त्यांचे नाव नाही मात्र हरियाणा विकास प्राधिकरणाचे चेअरमन असा सीबीआयने उल्लेख केलाय. कोविडच्या काळात २१ डिसेंबर २०२० रोजी मोतीलाल वोरा यांचे निधन झाले म्हणून त्यांचे नाव आरोपपत्रातून ब[...] झाले.

पंडित नेहरूंनी स्थापन केलेल्या असोसिएटेड जर्नल लि.च्या वतीने इंग्रजीत नॅशनल हेराल्ड, हिंदीत नवजीवन आणि उर्दूत कौमी आवाज ही वृत्तपत्रे प्रकाशित केली जात असत. या वृत्तपत्रातून स्वातंत्र्यांची चळवळ लढवली गेली. १९४७ मध्ये पंडित नेहरू पंतप्रधान झाले व त्यांनी कंपनीच्या संचालक मंडळाचा राजीनामा दिला. पण काँग्रे[स] पक्षाची या वृत्तपत्रांवर पकड कायम राहिली. १९५६ मध्ये एजेएलची व्यावसायिक कंपनी म्हणून नोंद करण्यात आल[ी.] पुढे आर्थिक संकटामुळे २००८ मध्ये सर्व प्रकाशने बंद पडली. २०१६ मध्ये केवळ डिजिटल मीडिया चालू होता. एजेएल कंपनीची मालमत्ता तेव्हा दोन हजार कोटींच्या घर[ात] होती, ती आपल्या ताब्यात घेण्यासाठी सोनिया व राहुल यांनी काँग्रेस पक्षाचे पैसै वापरले असा आरोप सुब्रमण्यम स्वामी यांनी केला व त्याचीच चौकशी ईडीने करून आरोपपत्र दाखल केले आहे.

नॅशनल हेराल्ड बंद झाला तेव्हा कंपनी काँग्रेसला ९० कोटी रुपये देणे लागत होती, २०१० मध्ये काँग्रेस पक्षाने [ते] कर्ज यंग इंडियन प्रा. लि. कंपनीकडे हस्तांतरित केले. यंग इंडियनचे ७६ टक्के समभाग सोनिया व राहुल यांच्याकडे आहेत. दोन हजार कोटींची मालमत्ता हडप करण्यासाठी खोटे व्यवहार करून पैशाची अफरातफर केल्याचा आरोप केला गेला. मनी लॉड्रिंगचा गुन्हा नोंदवला. यंग इंडियनने पन्नास लाखांत एजेएलची दोन हजार कोटींची मालमत्ता आपल्याकडे घेण्याचे कारस्थान रचले असा आरोप झाला.

दिल्लीत बहादूर शाह जाफर मार्गावर नॅशनल हेराल्ड[ची] इमारत आहे. शिवाय मुंबई, लखनऊ, भोपाळ येथेही कंपनीची मालमत्ता आहे. देशभरातील मोठ्या शहरातील मौल्यवान जागा गांधी परिवाराच्या हाती सोपविण्याचे एक मोठे कारस्थान रचले गेले असा आरोप केला जात आहे. मनी लॉड्रिंग ॲक्टनुसार ईडीने आरोपपत्र दाखल केले आ[हे.] त्यात सोनिया, राहुल, सॅम पित्रोदा, सुमन दुबे व इतरांची नावे आहे. मोठी पोल खोल होईल अशी काँग्रेसला भीती वाटते आहे, असे भाजपाने म्हटले आहे.

काँग्रेसने म्हटले आहे की, बारा वर्षांपूर्वीची ही केस आहे. एका पैशाचीही देवाण-घेवाण झालेली नाही. एकही मालमत्ता हस्तांतर झालेले नाही. पण आरोपपत्र दाखल झाल्याने ईडीची तलवार गांधी परिवारावर लटकते आहे.

sukritforyou@gmail.co[m]
sukrit@prahaar.co.[in]

# भाषा हे राजकारण्यांच्या हातातले हत्यार नाही!

भाषा हा शिक्षणातील पायाभूत घटक आहे. ती माणसाच्या अस्तित्वाची ओळख असल्यामुळे शिक्षणातील भाषा अध्यापनाचा विचार अतिशय सूक्ष्मपणे केला गेला पाहिजे. महाराष्ट्रात तो झाला असता, तर आज मराठी शाळांची शोकांतिका झाली नसती.

शालेय पातळीवर शिक्षणाचे मराठी माध्यम म्हणून मराठीची जी हेळसांड झाली आहे, तिच्याविषयी बोलताना



मन अस्वस्थ होते. शिक्षणाच्या बाबतीत इंग्रजीकरणाचे खापर लॉर्ड मेकॉलेच्या माथ्यावर मारून मोकळे होणे जास्त सोयीचे आहे पण मुद्दा हा आहे की स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या शिक्षणाचे भारतीयीकरण करण्यापासून आपल्याला कुणी रोखले होते का?

तुरळक अपवाद वगळता एकूणच भारतात मातृभाषेतील शिक्षण आपण प्रस्थापित करू शकलो नाही.



मायभाषा
डॉ. वीणा सानेकर

महाराष्ट्रात १९७० नंतर मराठी माध्यमाच्या शिक्षणाची जागा इंग्रजीतील शिक्षणाने घेतली. जागतिकीकरणाच्या झंझावातात शिक्षणातील मराठीचे स्थान हिरावून घेतले गेले. इंग्रजी शाळांचे स्तोम आणि मराठी शाळांची उपेक्षा असे आजचे विदारक वर्तमान आहे.

बदलापूर येथील आदर्श महाविद्यालयात नुकतीच डॉ. प्रकाश परब यांनी अभिजात मराठीवरील चर्चासत्रातील त्यांच्या बीजभाषणात जागतिक पातळीवरील युनेस्कोच्या अहवालाचा संदर्भ देत धोक्याच्या वळणावर असलेल्या भाषांचे संदर्भ देत त्यामागच्या कारणांची मांडणी केली.

"पुढल्या पिढीपर्यंत आपल्या भाषेचा आणि बौद्धिक संपदेचा वारसा पोहोचवण्यात मराठी भाषिक कमी पडत असल्याने मराठी ही सुरक्षित आहे असे आपल्याला म्हणता येणार नाही. इटालियन भाषकांनी त्यांची भाषा टिकावी म्हणून आटोकाट प्रयत्न केले. वेल्श भाषेला ती लुप्त होण्यापासून तिच्या भाषकांनी वाचवले. मावरी भाषेसाठी असेच प्रयत्न केले गेले. जगभरात अनेक असे दाखले आज उपलब्ध आहेत. भाषा संपते म्हणजे ती आत्महत्या करत नाही. तिची हत्या होते. तिचे भाषकच तिचे जगणे वा मरणे ठरवतात. समाजापाशी इच्छाशक्ती नसेल, तर शासनाने तिला जगवण्याचे उत्तरदायित्व घ्यावे, तिच्या मागे त्यासाठी आवश्यक ते पाठबळ उभे करावे" अशी भाषेच्या संदर्भात परब सरांनी केलेली मांडणी अत्यंत महत्त्वाची आहे.

आपल्याकडे मात्र शासन स्तरावरूनच मराठीच्या अहिताचे निर्णय घेतले जावेत यासारखे दुःख नाही.

'पहिली ते पाचवी हिंदी सक्तीची' ही ठिणगी शासनाने नुकतीच टाकली आहे. हळूहळू ही ठिणगी जाळ होऊन धगधगते आहे.

भारत हा बहुभाषिक देश आहे. प्रत्येक भाषेची स्वतंत्रशैली आणि वैशिष्ट्ये आहेत. भाषावार प्रांतरचनेनुसार प्रत्येक राज्याची राजभाषा आहे. त्या-त्या राज्यात शिक्षण, प्रशासन, कायदा अशा सर्व क्षेत्रांमध्ये राज्यभाषेला प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करीत राहणे हे त्या-त्या शासनाचे कर्तव्य आहे. या कर्तव्यापासून ढळून महाराष्ट्रात मराठीखेरीज अन्य कोणत्याही भाषेची सक्ती करता येणार नाही.

पहिली ते पाचवी हे भाषा आत्मसात करण्याचे वय आहे, पण याचा अर्थ मुलांच्या डोक्यावर आपण वाटेल तसे भाषांचे ओझे टाकावे, हे कुठल्याही मेंदू आधारित शिक्षणात बसत नाही. भाषा हे राजकारण्यांच्या हातातले हत्यार म्हणून वापरले जाते तेव्हा कोणत्याच भाषेचे भले होत नाही. हिंदीच्या पहिलीपासूनच्या सक्तीचा निर्णय महाराष्ट्र शासनाने त्वरित मागे घ्यावा कारण हे भाषिक अराजक ना हिंदीचे भले करणारे आहे ना मराठीचे!



# आदिवासी जमातीसाठी ती ठरली आरोग्यदूत

जगात ज्या काही दुर्मीळ आदिवासी जमाती आहेत. ज्यांचे पृथ्वीवरील अस्तित्व संपल्यात जमा झाले आहे. त्यातील काही जमाती अंदमान बेटावर आहेत. २००४ मध्ये आलेल्या विध्वंसक त्सुनामीने या आदिवासींचा उर्वरित जगाशी संपर्क तुटला होता. अशा परिस्थितीत त्या परिचारिकेने जीवाची पर्वा न करता सेवा शुश्रुषा केली. काहीजणींची बाळंतपणं करत या जगात नव्या जीवांना सुरक्षितपणे आणले. अंदमानच्या दुर्मीळ आदिवासी जमातीसाठी ती आरोग्यदूत ठरली. तिचं नाव शांती तेरेसा लाक्रा होय.

२००४ मध्ये, जेव्हा अंदमान किनाऱ्यावर त्सुनामी आली, तेव्हा शांती तेरेसा लाक्रा यांनी लिटिल अंदमानच्या दुर्गम भागात असलेल्या डुगोंग क्रीक येथील उप-केंद्रात परिचारिका म्हणून तीन वर्षे काम केले होते. या भागात भारतातील सर्वांत जुन्या जमातींपैकी एक असलेल्या ओंगे जमातीची वस्ती आहे. या जमाती नेग्रिटो वंशाच्या जमातीचा भाग असल्याचे म्हटले जाते.



दी लेडी बॉस
अर्चना सोंडे

त्यावेळी १०० पेक्षा कमी संख्येने असलेल्या ओंगेच्या आरोग्यसेवेसाठी लाक्रा यांनी स्वतःला समर्पित केले. या जमातींचा वैद्यकीय इतिहास माहीत नव्हता. त्यांची भाषा कळत नव्हती. अशा अडथळ्यांबद्दल कोणतीही माहिती नसताना शांती यांनी या जमातीच्या वस्त्यांना सातत्याने भेटी दिल्या. त्यांच्याशी मैत्री केली. आरोग्य केंद्रातील वैद्यकीय सुविधांचा लाभ घेण्याविषयीचे महत्त्व त्यांना पटवून दिले.

त्सुनामीने डुगोंग क्रीक येथील संपूर्ण वस्ती वाहून नेली. शांतीला जंगलात मागे हटून एका तात्पुरत्या तंबूत राहावे लागले. बराच काळ बाह्य जगाशी संपर्क नव्हता. वैद्यकीय साहित्य मिळणं देखील अवघड झाले होते. त्सुनामीमुळे विविध आजार पसरले होते. त्यामुळे शांतीला औषधांसाठी धावपळ करावी लागली. ओंगे लोकांसाठी आपत्कालीन औषधे आणण्यासाठी १२-१५ किमी चालत जावे लागले. या सर्व विनाशादरम्यान, एका गर्भवती ओंगी महिलेने फक्त ९०० ग्रॅम वजनाच्या बाळाला जन्म दिला. शांतीला दोघांनाही वाचवावे लागले. त्यांना उबदार ठेवावे लागले. कांगारू मदर केअरचा सराव करावा लागला. संपर्क यंत्रणा सुरू झाल्यावर, तिने पोर्ट ब्लेअरमधील जवळच्या जीबी पंत हॉस्पिटलमधून चार्टर्ड फ्लाइटची विनंती केली. शांतीला त्या आई अन् बाळाच्या जगण्याची फारशी आशा नव्हती; परंतु सहा महिन्यांनंतर, आई आणि बाळ निरोगी परत आले.

तिने एका रात्रीत ३-४ बाळंतपणात मदत केली, ती सर्व स्वतःच्या बळावर. शांतीचे खासगी आयुष्यदेखील संघर्षमय होते. ती तिच्या एक वर्षांच्या मुलासोबत आणि तिच्या पतीसोबत राहत होती. तिचा पती दुसऱ्या बेटावर स्वतःचा व्यवसाय करत होता. योग्य पोषण न मिळाल्याने शांती गंभीर कुपोषित होती. तिच्या सासरच्या लोकांनी तिला मदत केली आणि तिच्या बाळाला त्यांच्यासोबत राहण्यासाठी घेऊन गेले.

त्सुनामी ओसरल्यानंतर ती आणखी दोन वर्षे ओंगे लोकांसोबत राहिली. त्या काळात तिला तिच्या कुटुंबाला भेटता आले नाही. जसे ओंगे जमातीचे लोक जंगलात स्थलांतरित झाले, तसतसे तिला अनेकदा तास न तास चालावे लागले. भरतीच्या वेळी समुद्रातून जावे लागले. त्यांना आरोग्यसेवा देण्यासाठी दाट झाडीतून चालावे लागले. २००६ च्या अखेरीस, शांतीला पोर्ट ब्लेअरमधील जीबी पंत रुग्णालयात हलवण्यात आले. ती विशेष वॉर्डमध्ये, आदिवासी आणि दुर्गम भागातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांमधून (पीएचसी) पाठवलेल्या विशेषतः असुरक्षित आदिवासी गटांसाठी (पीव्हीटीजी) काम करते. अंदमान आदिम जनजाती विकास समिती (AAJVS) च्या इतर कर्मचाऱ्यांसोबत ती आदिवासींसाठी दिवसरात्र वॉच अँड वॉर्ड ड्युटी म्हणून काम करते. ती रुग्णांची काळजी घेते, त्यांची वैयक्तिक स्वच्छता करते. अन्न आणि कपड्यांची व्यवस्था करते. बेड बनवते. रुग्णांना डॉक्टरांकडे घेऊन जाते. एक्स-रे, ईसीजी, यूएसजी, सीटी स्कॅन आणि एमआरआय सारख्या विविध तपासण्यांसाठी देखील मदत करते.





२०१९ मध्ये अजून एक जागतिक संकट उद्भवले ते म्हणजे कोरोनाचे. कोविड-१९ साथीच्या काळात, शांती आणि तिच्या टीमने विविध आदिवासी वस्त्यांमध्ये प्रवास केला. बहुतेकदा ५-६ तास बोटीतून, उंच लाटांमधून ते जात. त्यांना माहीत नव्हते की ते त्यांच्या छावणीत परत येतील की नाही. मात्र त्या प्रयत्नांमुळे, आदिवासी लोक स्वतःला वेगळे करण्यात यशस्वी झाले होते आणि स्वतःची चांगली काळजी घेत होते. तथापि, शांतीच्या टीमचे ध्येय त्यांचे लवकर लसीकरण करणे होते. जेणेकरून रोग अधिक पसरू नये. या लोकांना आदर महत्त्वाचा आहे. शांतीला उमगले होते की, त्यांच्या संस्कृतीचा, त्यांच्या श्रद्धेचा आणि जीवनशैलीचा आदर करणे महत्त्वाचे आहे. तिने योग्य त्या चालीरितींचा, श्रद्धांचा आदर केला. परिणामी त्या लोकांचा शांतीप्रती विश्वास वाढला, ते सु[द्धा] तिचा आदर करू लागले. आता बहुतेक जमा[ती] वैद्यकीय मदत घेण्यास नकार देत नाहीत. महिला नियमितपणे प्रसूतीपूर्व तपासणीसाठी जातात. जन्मलेल्या बाळांच्या वजनातही फर[क] आहे. पूर्वी बाळांचं वजन २ किलोपेक्षा कमी असे. आता ते सुमारे २.५ ते २.७५ किलो भरते. आरोग्याच्या दृष्टीने ही प्रगती उत्तम मानली जाते.


आरोग्यसेवा शुश्रुषा क्षेत्रातील नोबेल समजला जाणारा फ्लोरेन्स नाईटिंगेल हा पुरस्कार शांती तेरेसा लाक्रा यांना बहाल करण्यात आला. भारत सरकारने देखील त्यांच्या आरोग्य क्षेत्रातील योगदानाची दखल घेत पद्मश्रीने सन्मानित केले.

काही दिवसांपूर्वीची गोष्ट आहे. एक तरु[णी] मुलगी शांतीकडे आली. तिने शांतीच्या पायां[ना] स्पर्श केला. त्सुनामीच्या वेळी शांतीने बाळंत[पण] केलेल्या बाळांपैकी ती एक आहे. त्या मुलील[ा] पाहून शांतीच्या डोळ्यांतून आनंदाश्रू आले. ह[ा] क्षण तिच्यासाठी एक मोठा सन्मानच होता.

# लिंबू लोणचं

सृष्टीचे तत्त्व सांभाळा, नेहमीची येतो उन्हाळा. वर्षभरात तीन ऋतूंच्या तीन तऱ्हा सांभाळताना होणारा त्रास परिणामकारक आहे. ऋतूचक्रात झालेले बदल, तापमान वाढ, भयावह पाणीटंचाई, वणव्यांची नैसर्गिक मालिकाच सुरू आहे. यायोगे पावसाचं अनियमित वेळापत्रक, सूर्याची वाढती उष्णता, गायब झालेली गुलाबी थंडी याचा संमिश्र परिणाम हवामानावर, पिकांवर आणि आरोग्यावर दिसून येतोय. बदललेल्या हवामानाचा सर्वात जास्त फटका शेतीवर झाल्याने अन्नधान्याच्या कमतरतेसह दैनंदिन जीवन व्यवहाराची सगळी गणित फोल ठरताना दिसत आहेत. त्या त्या ऋतूतल्या भाज्या आणि फळांनी अंग टाकल्याने महागाईचा राक्षस डोक्यावर नाचतोय. वेळेवर न मिळणाऱ्या भाज्या, तर कधी वेळेआधीचं फळ निर्मिती यामुळे फळांच्या गोडी आणि चवीमध्ये तफावत जाणवतेय. एकंदरीत सर्वत्र परिस्थिती सारखी असल्याने, डोक काम करत नाहीए. एकीकडे दैनंदिन व्यवहारासाठी बाहेर पडणं गरजेचं असलं, तर दुसरीकडे रणरणत्या उन्हामुळे घराबाहेर पडणं मुश्किल होतय. अशावेळी काय बरं करावं माणसानं? आमच्यासारख्या गृहिणी घरातल्या घरात थंडावा निर्माण करणारे पदार्थ करण्याकडे वळतात. माझाही तोचं प्रयत्न असतो. मे महिन्याआधीच मार्च, एप्रिल तापल्याने आमची डोकी तरी शांत राहतील का? थंड वगैरे करण्यासाठीच्या प्रयत्नात थंडा थंडा कूलकूल करत सुगरणींचे हात थकत नाहीत. थंडाई, आवळा, कोवळा, संत्री, मोसंबी, कोकम, कलिंगड, वाळा घरात वेगवेगळ्या प्रकारांची सरबराई चालू असताना सोबत वाळवणीतले पापड, कुरडई यांसारखे पदार्थ म्हणजे वर्षभराच्या बेगमीची बात बनते. या बेगमीवरून मागील कोरोनाचा काळ आठवला. आपलं जगणं मुश्किल करणाऱ्या या महामारीने नाड्या आवळल्या होत्या आपल्या. अन्न, वस्त्र, निवारा यांसारख्या महत्त्वाच्या गोष्टीं मिळणं कठीण होतं. गृहिणींवर कामाचा अतिरिक्त भार, जोडीला चोवीस तास काम आणि आराम हराम अशी गत होती. पण त्यातही आपल्या गृहिणी हुशारचं म्हणायला हव्यात..! जमेल तेवढी बचत करत सगळ्यांची भूक आणि क्षुधा भागवणाऱ्या गृहिणींच खरे तर कौतुक व्हायला हवं. अशीचं एक गृहिणी म्हणजे मी ! म्हणजे काय? तेच तर सांगायचा प्रयत्न करतेय केव्हापासून... तर लिंब आणण्यासाठी यांना बाजारात पाठवलं असता, वीस रुपयाला दोन लिंब घेऊन आले हे... मी अवाक् झाले. महागाई, महागाई म्हणजे काय...! आताशा तोंडचं पाणी पळवलेल्या काही लिंबांनी आमचा त्यावेळचा कोरोना काळ सुखावह केला होता. त्या विषयीची एक रुद्र आठवण अजूनही मन लिंबोरं करून जाते. त्याचं असं झालं की...





मोरपीस
पूजा काळे

नैसर्गिक देणगीसह मनाची श्रीमंती लाभलेले सारस्वत म्हणजे गोव्याचं समृद्ध साम्राज्य. मंडळी कथा गुंफत जाते गोव्याभोवती आणि हाती गवसतं लिंबू लोणचं ऐकायला थोडं अवघड आणि विचित्र वाटत असेल ना...! पण कथानकाची सुरुवातचं भल्या मोठ्या लिंबांनी होते. दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात शांतादुर्गा, मल्लिकार्जुन जत्रेसाठी गोव्याला जाणं व्हायचं तसं ते त्या वर्षीही झालं होतं. फिरण्याचा भाग म्हणून देवळं, समुद्रकिनारे बघून झाले होते. मुंबईत येण्याच्या दोन दिवसाआधी पैंगिणच्या मोठ्या नणंदबाईंकडे गेलो होतो. त्यावेळी ताईंनी भेट स्वरूपात अननस, नारळ, पेरू कढीपत्त्याची पानं माझ्या पिशवीत भरली; परंतु कायम स्मरणात राहील अशी प्रेमस्वरूप भेटही दिली, म्हणजे निघताना ताईंनी दोन डझन लिंब...! अहो लिंब कसली प्रथम दर्शनी इडलिंबू वाटणारी, बाहेरून पिवळी, तर आतून केशरी रंगाची बॉन्साय जातीची भारतीय लिंब माझ्या ओंजळीत टाकली. पातळ सालीची ओंजळीत न मावणारी लिंब मनात भरली. या लिंबांच करायचं काय? हा प्रश्न नव्हता! मार्च-एप्रिल महिन्याचा उकाडा जाणवत असला तरी, शरीराचा दाह लिंबू सरबताने शमणारा नव्हता. म्हणजे केवळ सरबतासाठी ती वापरण्याचा वेडेपणा मी टाळणार होते... अग् काय एवढं गोळा करते आहेस, अहोंनी नेहमीप्रमाणे फटकारलं, माझा मेलीचा मोह सुटत नव्हता, शिवाय एवढी भलीमोठी, पातळ सालीची लिंब घरच्यांना दाखवायची हौस होतीच... यांच काहीही न ऐकता ताईंनी दिलेली भेट घेऊन आम्ही मुंबई गाठली. सोबत आणलेली लिंब एका अर्थाने पथ्यावरचं पडली होती.


लॉकडाऊन सुरू होण्याचा काळ तो. मुंबईत सर्वत्र रोगाचा संसर्ग वेगाने पसरत चाललेला. बाहेर पडायचं म्हणजे रोगाला निमंत्रण होतं. कोरोनाच्या पुढच्या टप्प्यात पैसा, घरसामान सगळ्याला आळा बसणार होता. जमेल तेवढी काटकसर करून महिला जेरीस येणार होत्या, तर कुटुंब वेठीस पडणार होत. त्याकाळी इतर गृहिणींसारखीचं माझ्यावरची जबाबदारी सुद्धा वाढली होती. सहा जणांचा घरपसारा सांभाळायचा म्हणजे जंग की लढाईचं म्हणा ना...! कधी आल्याचा अर्धा तुकडा जपून वापरला, तर कधी लसूण पाकळी कष्टाने जोपासली. कोथिंबिरीची एक काडी, भाज्यांचे देठ कसोशीने हाताळले. पाव चमचा तेलाच्या फोडणीत दोन वेळची आमटी रटरटवली. कमी साखरेचा बीन दुधाचा चहा रिचवला. भयंकर काटकसर केली. फक्कड बेत आखले. कौटुंबिक जेवणाचा आस्वाद सगळ्यांनी अनुभवला. त्यावेळच्या अखिल महिला वर्गाची अवस्था अगदी माझ्यासारखी होती.


या पुढचं कथानक असं...

... तर त्याचं असं झाल...! या गडबडीत मी लिंब विसरलेचं होते. म्हणजे पुरवून पुरवून वापरताना उरलेली पंधरा लिंब फ्रिजमध्ये शिल्लक होती. मग काय विचारता ती फुकट जाऊ नये म्हणून केला आटापिटा. लागले कामाला. लिंब जास्तचं पिकून रस सोडू लागली होती. डबा उघडताचं घमघमीत सुवास पसरला होता. लिंब स्वच्छ धुतली, पुसली आणि सालासकट लावली मिक्सरला. वरून मीठ, लाल तिखट, साखर घालून काढली तीची वरात... मिक्सरमध्ये अशी गरागरा फिरवली की बास्... झाली एकजीव आणि पुढील तीन महिन्यांसाठी माझा जीव लिंबासारखा केशरी होऊन भांड्यात पडला. घम्म केशरी रंगाचं लोणचं तयार झालं होतं. गरगरीत, आंबट, तिखट, तुरट, मधाळ लिं[बू] लोणचं हौशेने खाल्लं आणि सगळ्यांना खा[यला] घातलं हे विशेष. एक किलो बरणीला आले[ले] प्रोफेशनल टच विचारूचं नका...! सासूबाई तर कौतुक करत सुटल्या होत्या, माझ्यासह लोणच्याचं. इथं सांगायचं एवढचं की, पडत[्या] काळात माणसाला माणसं भेटू शकली नव्ह[ती] तरी, निसर्गाने नेहमीच्या सेवावृत्तीनं त्याच्या ठायी असलेलं उदारपण निभावलं होतं. एक कोपरा लोणच्याचा भरल्या ताटाची शान वाढवतो हे खरं आहे. कारण हे लिंबू लोण[चं] ताटात तोंडी लावायला म्हणून, तीन महिने सोबत करत होतं आम्हाला. जीवाचं रान करून काटकसरतीच्या जोडीला विसावले[लं] लिंबू लोणचं कायम स्मरणात राहील. आजच्या घडीला महागाईचा भस्मासूर वाढतोय. संकट काय घेऊन येतील? कुणा[ला] सोबत घडवतील? कुणाला दूर लोटतील? कोण उपयोगाला येईल? काही सांगता यायचं नाही. कोरोना काळात सोबत करणा[री] लिंब आजच्या घडीला ऐन मार्च, एप्रिल महिन्यात महाग झाली असली तरी, अस्सल खवय्येगिरी करणाऱ्यांना काही फरक पडण[ार] नाही. कारण कितीही नैसर्गिक आपत्ती महामारी वा तुटवडा आला तरी मनुष्याकडे कुशाग्र बुद्धी नावाची चावी असल्याने ती कुठे आणि कशी वापरता येऊ शकते, हे तो चांगलंच जाणतो. लिंब महाग झाली म्हणून काय झालं? जोवर आमच्याकडे पर्याय आहेत तोवर आम्ही सुखाने संसार करू. आनंदाने ताट भरू. कारण काटकसरीत सुखाचा संसार करायचं सामर्थ्य अशा प्रकारची लोणचीचं देतात हे समजायला घरची सुगरण हुशार असावी लागते, अगदी माझ्यासारखी...!

## जागतिक पुस्तक, कॉपी राईट दिनानिमित्त...

# भूतकाळासह भविष्यकाळातील दुवा म्हणजेच 'पुस्तकं'







प्रासंगिक

**मृणालिनी कुलकर्णी**

कन्नड साहित्यिक भैरप्पा यांनी त्यांना सरस्वती सन्मानाचे मिळालेले 'पाच लाख रुपये परत करतांना म्हणाले, 'हे पैसे कन्नड भाषेच्या संवर्धनासाठी वापरावेत. त्यामुळे आमचे साहित्य वाचणारा वाचक तरी शिल्लक राहील, वाचक शिल्लक राहिला, तर पुस्तके लिहिली जातील, ग्रंथालये टिकतील.'

काही वर्षांपूर्वी प्रत्येकाच्या घरी दोन वृत्तपत्रे, साप्ताहिक, महिन्याचे मराठी मासिक, ग्रंथालयातील एखादे पुस्तक हॉलमध्ये असे. त्यांची शेजारच्या बरोबर देवघेव करतांना चर्चाही होत होती. वृत्तपत्रांच्या वाचनीय पुरवण्यांमुळे इतर वाचन आणि कोरोनानंतर रोजचे वृत्तपत्रही बंद झाले. पुस्तकांचे कपाट घराची शोभा वाढवीत असे. आज ती जागा गॅझेटने घेतली आहे. ही परिस्थिती दूर करण्यासाठी स्वतःलाच विचारा, 'तुम्ही वाचक आहात का?' वाचनाचा आनंद वाढविण्यासाठी, आयुष्यभर शिकण्यासाठी, विविध विषयावरची पुस्तकांची व्याप्ती ओळखण्यासाठी, जीवनांत साहित्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी, अनेक पिढ्यांचा भूतकाळ आणि भविष्यकाळातील दुवा, संस्कृती साधण्याचा पुस्तक हा एक पूल आहे.

२३ एप्रिल हा जागतिक साहित्यातील एक प्रतीकात्मक दिवस. २३ एप्रिल हा जगप्रसिद्ध साहित्यिक विल्यम शेक्सपियर यांचा जन्म आणि मृत्यू दिवस होय. त्यांच्याबरोबर मिगुएल डी सर्वेट्स आणि इंका गार्सिलासो अशा काही प्रथितयश लेखकांचेही त्याच तारखेला निधन झाले होते. स्वाभाविकपणे त्यांच्या प्रती आदर व्यक्त करण्यासाठी, नागरिकांना वाचनाची आवड लागावी, वाढावी. तसेच कॉपी राईटलाही प्रोत्साहन मिळावे यासाठी २३ एप्रिल हा "जागतिक पुस्तक आणि कॉपी राईट दिवस" म्हणून जगात १०० च्या वर देशांत साजरा करतात. कॉपी राईटचा अर्थ कामावर असलेल्या मूळ लेख किंवा तत्सम वस्तूचे संरक्षण करणे. निःसंशयपणे या दिवशी वाचकांसहित लेखक, प्रकाशक, शिक्षक ग्रंथपाल, मास मीडिया सारे एकत्र येतात. साऱ्यांना व्यासपीठ मिळते.

२३ एप्रिल १९९५ पासून हा जा. पु. दिवस युनेस्कोकडून साजरा केला जातो. १९२२ साली बार्सिलोना येथे प्रसिद्ध लेखक मिगुएल डी सर्वेट्स यांचा सन्मान करण्यासाठी आणि पुस्तकाची विक्री वाढविण्यासाठी व्हिंसेंट क्लेव्हल यांनी जा. पु. दिनाची प्रथम कल्पना मांडली होती.

२००१ पासून युनेस्को एका वर्षासाठी पुस्तक उद्योग क्षेत्रातील सल्लागार समितीसह एका राजधानीची निवड करते. २००३ साली हा सन्मान भारताला मिळाला होता. "वाचन संस्कृती वाढवा" या थीमसाठी भारताने नवी दिल्ली येथे पुस्तकासाठी वर्षभर कायमस्वरूपी मंडप बांधला होता. युनेस्कोच्या मते तरुण पिढींना शिक्षित करण्यासाठी जा. पु. दिन हे अविश्वसनीय साधन आहे."

ब्राझीलमधील 'रिओ दि जानेरोला' ही २०२५ ची जा. पु. दिवसाची राजधानी असून "तुमच्या पद्धतीने वाचा". ही थीम पुस्तक निवडीला स्वातंत्र्य देते. वाचनाची गोडी लागावी हाच प्रधान हेतू होय.

वाचन ही एक शक्ती आहे. ती आपल्याला अडीअडचणीला, एकटे असतांना, करिअर निवडताना सक्षम बनविते. जगभरातील अनेकांच्या आत्मचरित्रातून त्याचा प्रवास समजतो. जग समजून घेण्यास मदत होते. आपल्या आयुष्यात नव्याने खिडकी उघडते. पुस्तक प्रश्नांकडे कसे पाहायचे हा दृष्टिकोन देते. म्हणून वाचाल तर वाचाल.

आंबेडकर म्हणाले होते, 'समृद्ध व्हायचे असेल, मुख्य प्रवाहात यायचे असेल तर वाचनाला पर्याय नाही. डॉ. कलाम म्हणतात, १०० मित्रांची जागा एक पुस्तक घेतो. स्वामी विवेकानंदानाही वाचनाचे प्रचंड भोक्ते होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष विल्सन यांनी वयाची २१ वर्षे पूर्ण होण्याआधी १००० ग्रंथांचे वाचन केले होते. जो अवांतर वाचन करतो, तोच शिकतो आणि पुढे जातो.

महाराष्ट्रातील 'भिलार' हे भारतातील पहिले पुस्तकांचे गाव आहे. ३५००० हून अधिक पुस्तके मोफत वाचायला मिळतात. मुंबईतही एशियाटिकसारख्या काही ग्रंथालयांत पुस्तकांच्या सहवासात पुस्तक वाचता येते. सुट्टीत महाभारत, रामायण, पंचतंत्र ही पुस्तके वाचून नीतीमूल्य जाणून घ्यावीत. सुधा मूर्ती, लांजेकर अशा अनेकांनी गावात ग्रंथालये उभी केली आहेत. अक्षर मंचाचे डॉ. योगेश जोशी वाचन संस्कृती, भाषेचा विकास वाढविण्यासाठी अनेक उपक्रम राबवितात. नुकताच ३६ तासांचा वाचनयज्ञ केला होता.

भारतातील ग्रंथालयाचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन आहेत. ग्रंथालयात नियमितपणे येणारा एक विद्यार्थी १० वीला नापास झाल्यावर सारे म्हणाले एक वर्षे फुकट गेले; परंतु ग्रंथपालाने नियमितपणे वाचायला दिलेल्या पुस्तकांमुळे पुढे तो मोठा अधिकारी झाला.

आपल्या शाळेतील ग्रंथालयातील पुस्तकांची आपल्या मुलाला ओळख व्हावी, या सुप्त हेतूने बापूसाहेब रेग्यांनी (बालमोहन) त्याला ग्रंथालय लावायला सांगितले होते. रात्री झोपण्याच्या आधी प्रेरणादायी असे वाचावे. झोपेत तेच पाहतो. वाचनाची मुलांना सवय लागण्यासाठी सुरुवातीला पालकांनी मुलांना पुस्तकांच्या ठिकाणी नेले पाहिजे. गोष्टी वाचून दाखवणे. मॉलमध्येही खरेदीनंतर पुस्तक दालनात भेट द्या. घरात मुलांच्या आवडीच्या विषयांची पुस्तके पसरलेली असावीत. हा पसारा नव्हे.

यावर्षी मराठी भाषादिनानिमित्त मनसेतर्फे शिवाजी पार्क येथे १०५ प्रकाशकांच्या पुस्तकांचे भव्य प्रदर्शन भरले होते. तेथील अनुभव-एका मुलाने पुस्तक मागितल्यावर तुला मराठी कळणार नाही म्हणून पुस्तक घेतले नाही. जर पालकांनी वाचून त्याला सारांश सांगितला असता तर ... हॉटेल, चित्रपट, पूजाऱ्याच्या थाळीत पैसे ठेवायला लोकांचा हात लगेच खिशांत जातो; परंतु पुस्तक घेताना किंमत बघताच, पुस्तक खाली ठेवले जाते. कॉलेजच्या अभ्यासाची पुस्तके आणण्यासाठी दिलेल्या पैशातून मुलगा वाचनासाठी पुस्तके घेऊन घरी आला, वडिलांनी स्वागत केले.

अमृत देशमुखला १० वीला असताना भावाने 'रिच डॅड पुअर डॅड' हे पुस्तक दिले. या पुस्तकाने वाचनाची आवड निर्माण झाली. आज दिवसाला रोज एक पुस्तक वाचतो. जास्तीतजास्त लोकांनी पुस्तके वाचावीत यासाठी 'मेक इंडिया रीड' हे अॅप सुरू केले आहे. 'द हॅबिट ऑफ विनिंग', 'चिकन सूप फॉर सोल" या मालिकेतील पुस्तके, शिवखेरा, द सेव्हन हॅबीटपॉपिलॉन, द काइट रनर, लुईस-अनिता यांचे पंचतंत्र आणि लिडरशीप अशी अनेक मराठीत अनुवादीत केलेली पुस्तके आहेत. या पुस्तकांमुळे त्यांची लोकसंस्कृती, लोकजीवन, सण उत्सव, विज्ञान, अध्यात्म हे सारे समजते.

शाळा कॉलेजात अनेक उपक्रमांतून मुलांची वाचनाची गोडी वाढवू शकतो. पुस्तकाचे जाहीर वाचन, चर्चा, प्रश्न मंजुषा, पुस्तक परीक्षण, कथाकथन, गोष्ट वाचून दाखवा. साहित्यावर आधारित प्रश्नपत्रिका, नाट्य वाचन, कथेच्या थीमवर वेशभूषा, पुस्तक भिशी... त्यातून सर्वांना एकत्र बोलावून ज्ञानाचे वातावरण तयार करता येते. अनुवादित पुस्तकांमुळे इतर प्रांतीय पुस्तकांचा आस्वाद घेता येतो. अनुवाद करणे हेही एक कौशल्य आहे. वृत्तपत्रात दर आठवड्याला नवीन पुस्तकांचे परीक्षण येते. वर्षअखेरीस प्रथितयश लोक यावर्षी वाचलेली, आवडलेली पुस्तकांची नावे सांगतात. ज्ञानपीठ विजेती पुस्तके वाचा.

आज वाचनाची माध्यमे बदलली. मुले पुस्तक वाचत नाहीत हा सूर ऐकतो; परंतु ऑनलाईन, इ-बुक, यूट्यूबवरील भाषणे, प्रकाशन समारंभ, ऑडिओ, पॉडकास्टमधून युवक केव्हाही, कुठेही ऐकतो. आजच्या मुलांना आंतर्देशीय गाणी, कविता, लेखक त्यांची पुस्तके माहीत आहे. सोशल साईटवर ते वाचतात. जगात काय चाललंय येथे लक्ष ठेवून आहेत. त्यांचे विषय वेगळे. थोडक्यात वाचन कोणतेही असो, वाचनाची सवय लागणे गरजेचे आहे.

१५ ऑक्टोबरला डॉ. कलाम स्मृती दिनानिमित पुस्तक प्रेरणा दिन आपण साजरा करतो. मे महिन्यात घरातल्या शाळेत आपली मूल्यांवर आधारित जुनी पुस्तके, रामायण, महाभारत, बिरबल, पंचतंत्र, इसापनीती, किशोर हीही वाचायला द्यावीत.

पुस्तके आपल्याला दिशा दाखवतात, जीवनाला अर्थ प्राप्त करून देतात. पुस्तकाचे जगच विलक्षण आहे. शांतपणे, निवांतपणे कुणालाही त्रास न देता आपण आनंद घेतो.

mbk1801@gmail.com



# कोलाज

# 'टीनएजर्सच्या पालकांकडून अपेक्षा'





आनंदी पालकत्व

**डॉ. स्वाती गानू**

वयाची दहा-बारा वर्षे मुलांशी आपण किती सहज बोलू शकतो, गप्पा मारू शकतो, चेष्टा, मस्करी करू शकतो. मात्र मुलं जसजशी टीनएजर्समध्ये येऊ लागतात त्यांच्याबरोबर आपलं असलेलं नातं, रिलेशनशिपमधलं सहजपण हरवून जातं, गुंतागुंतीला सुरुवात होते. आपल्या नात्यात गॅप पडत जातो. मुलांना वाटतं आपल्या आई-वडिलांनी आपल्या भावना समजून घ्याव्यात. त्यांच्या अपेक्षा आपल्या पालकांकडून अशा असतात की,

१. त्यांना फक्त उपाय नको असतात, तर त्यांनाही घरात किंमत मिळावी असं त्यांना वाटतं.

पालक खूप लवकर एखादा प्रश्न सोडवावा या हेतूने परिस्थितीत उडी घेतात. जेणेकरून मुलांचा मार्ग सुरळीत व्हावा. मुलांनी आपल्याला त्यांची अडचण सांगितली, प्रॉब्लेम मांडला की, आपण तत्काळ उपाय देतो. दरवेळेला मुलांना त्यातून बाहेर पडण्याचा मार्गच हवा असतो असं नाही, तर कधीकधी मुलांची फक्त एवढीच अपेक्षा असते की, पालकांनी आमचं म्हणणं ऐकून घ्यावं, आमच्या बोलण्याला किंमत द्यावी.

तुम्ही त्यांच्या प्रत्येक गोष्टीला, निर्णयाला मान्यता द्यावी, समर्थन करावं असं नाही. त्यांची एवढीच अपेक्षा असते की, आपल्या भावना खऱ्या आहेत, त्यांनाही महत्त्व आहे हे पालकांनी समजून घ्यावं. अशावेळी आपण असं म्हणून मुलांचं मन सांभाळू शकतो की, जे झालंय ते खरंच खूप कठीण आहे तुझ्यासाठी आणि मला कळतंय की तू नाराज का आहेस? आपण त्यांना आपल्या भावना ओळखून त्या समजून घ्यायला वेळ देऊ या. सोल्युशन्स नक्कीच मिळतील. पण खरी सहानुभूती ही उत्तम संवादासाठीची पार्श्वभूमी तयार करायला उपयोगी ठरते.

जेव्हा मुलांच्या भावनांना किंमत दिली जाते, मूल्य समजून घेतलं जातं तेव्हा मुलं आपलं मन मोकळं करायला सुरुवात करतात, मिटून जात नाहीत.

२. मुलांची अपेक्षा असते की, आम्हाला स्वातंत्र्य मिळावं. खरं म्हणजे ही त्यांच्या आयुष्याची पहिली पायरी असते. त्यांच्याकडे बंडखोर मुलं म्हणून पाहू नका.

वरवर पाहता असं वाटतं की, टीनएजर्सना आपल्याला स्वातंत्र्य मिळावं अशी इच्छा असते. मात्र पालकांना ती इच्छा जबरदस्तीने आपल्या अपेक्षा पूर्ण करण्याकडे ढकलणारी वाटते पण तसं नसतं. प्रत्यक्षात ते स्वतःची आयडेंटिटी, स्वओळख तयार करत असतात. त्यांना स्वतःचे निर्णय स्वतःच घ्यायचे असतात. मुलं जेव्हा स्वतःचे चॉईसेस घेतात तेव्हा ते अनुभवातून सेल्फ रिलायन्स शिकतात. ते आत्मनिर्भर होतात. त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

त्यांची काळजी घेणारे पालक म्हणून त्यांना हॅन्डल केलंत, तर मुलं त्यांच्या वाढणाऱ्या जबाबदाऱ्या आत्मविश्वासाने पार पाडताना दिसतात. यातूनच ते स्वतःचा शोध घेत असतात. मुलांना या गोष्टी करण्यासाठी, स्वतःचा विकास करण्यासाठी आपण पुरेशी संधी दिली, तर आपलं नातं अधिक दृढ होईल. कारण मुलं असं समजतात की, आपल्यातील क्षमता आपले पालक जाणतात. तेच आपल्यातील क्षमतांना ओळखू शकतात.

३. त्यांना सृजनशीलतेची आस असते. परफेक्शनपेक्षा मुलांना ते जास्त महत्त्वाचं वाटतं. या वयातील मुलांच्या व्यक्तिमत्त्वात तुम्हाला कपट, ढोंग शोधूनही सापडत नाही. मोठी माणसं जेव्हा गोड बोलून मुलांना भुलवतात, भासवतात की त्यांना काहीच प्रॉब्लेम नाही. तेव्हा ते अक्षरशः हैराण होतात.

मुलांना तुम्ही परफेक्ट पालक म्हणून असण्यापेक्षा स्वतःच्या आयुष्यातील चढ-उतार कसे हाताळता, त्यांना कसे सामोरे जाता हे पाहून त्यांना जास्त फायदा मिळू शकतो.

सगळ्याच प्रश्नांची उत्तरं तुमच्याकडे नसणार. हे तुम्ही मान्य करता आणि आयुष्य जगता. मुलं हे बघतात आणि त्यांना हे साम्य जाणवते की, आपले पालकही आपल्यासारखेच मनुष्यप्राणी आहेत. या आपापसातील सामंजस्यामुळे पालक आणि मुलं यांच्यामधील संवाद अधिक रुजत जातो, फुलतच जातो. कारण तुम्ही मुलांबाबत मुल्यमापनात्मक न होता त्यांचं सगळं म्हणणं ऐकून घ्याल असं त्यांना वाटतं. आपल्या अडचणी, दोष पालकांसमोर सांगू शकतो, इथे सांगणं सुरक्षित आहे असं मग त्यांना मनापासून वाटतं.

४. त्यांच्या रोजच्या आयुष्याइतकंच त्यांचं ऑनलाइन जगही महत्त्वाचं असतं. हे पालकांनी समजून घ्यावं, ही मुलांची अपेक्षा असते. मुलांच्या दृष्टीने ऑनलाइन जग हे महत्त्वाचे असल्याने त्याबद्दल एकदम निगेटिव्ह न बोलता किंवा ते तर एक नुसतं गेम वर्ल्ड आहे असं न म्हणता रील वर्ल्ड आणि रियल वर्ल्ड हे वेगवेगळं आहे असं म्हणून कमीत-कमी शब्दांत नाराजी व्यक्त करता येईल. कारण काही वेळेला हळूवार, संवेदनशील टीनएजर्स मुले-मुली यात इतके गुंतून जातात की, काही भावनिक प्रसंग पडद्यावर पाहताना त्यांचं मन खरंच दुखावलं जातं. शिवाय जर त्यांच्या मित्रांनी त्यांना 'अनफॉलो' केलं तरी ती बाब त्यांच्यासाठी क्षुल्लक नाहीतर खूप महत्त्वाची असते. हे 'सोशल रिजेक्शन' मुलं सोसू शकत नाहीत.

मुलं ऑनलाईन असोत की, ऑफलाईन मुलांची स्वतःची मान्यता, मूल्य, किंमत, अस्तित्व, सेल्फवर्थ ही मोठ्या प्रमाणात त्यांचा पीअर ग्रुप काय प्रतिसाद देतो यावर अवलंबून असते.

अर्थातच म्हणून तुम्ही मुलांना अनलिमिटेड स्क्रीनटाईम द्यावा असं नाही; परंतु त्यांचा अवास्तव अनुभव जो बहुतेक वेळा डिजिटल माध्यमातील असतो तरीही तोही महत्त्वाचा आहे हे पालकांनी समजून घ्यावं असं मुलांना वाटतं आणि यामुळे तुम्हाला त्यांना मार्गदर्शन करण्यात मदतच होत असते हेही तितकेच खरे आहे.

त्यांना ऑनलाईन किंवा आभासी जगापासून पूर्णपणे तोडून टाकण्यापेक्षा तुम्ही योग्य मर्यादा घालून मुलांना डिजिटल माध्यमं वापरण्याच्या जबाबदार सवयी लावू शकता उदाः मधून मधून ब्रेक घेणं किंवा स्क्रीन वापरणं कधी थांबवायचं, कुठे आणि कसा कंट्रोल करायचा हे समजून घेणं या गोष्टी आपल्याला मुलांकडून करून घ्याव्या लागतील.

५. टीनएजर्स आणि त्यांचे पालक यांच्या नात्यात आणि संवादात अडथळे येतात. अनपेक्षित अडचणी आणि समस्या येतात. टीनएजर्समधील मुलं शांत बसतात किंवा नुसतं हां, हं, हम्म, ओ. के, बरं, हो, नाही असं अगदी कमीत कमी बोलतात. जणू काही पालकांनी त्यांच्या मनातलं ओळखावं अशी परिस्थिती निर्माण होते. मुलं काही बोलायला लागली आणि पालक त्यांना बोलू न देता चूक, बरोबर सांगायला लागले, अडथळे निर्माण करायला लागले तर मुलांचं बोलणं बंद होतं. याऐवजी आपण असं म्हणू शकतो की 'तुला जर काही सांगायचं असेल, बोलायचं असेल तर मी आहे' आणि खरंच मग मुलांना तुमच्याशी बोलावसं वाटतं. त्यांना स्पेस मिळते.

एकप्रकारे मुलांच्या मतांना, त्यांच्या म्हणण्याला आदर दिला जातो असं मुलांना वाटायला लागतं. मुलांचं नकारात्मक वागणं, ती भावना थोड्या प्रमाणात का होईना कमी होत जाते.

या वयातील मुलांच्या मनात त्यांच्या भविष्याबद्दल बऱ्याच गुंतागुंतीच्या भावना असतात. याबद्दल शेअर करताना त्यांना अशी व्यक्ती हवी असते जी कोणत्याही प्रकारच्या निष्कर्षावर उडी न मारता एका उत्तम श्रोत्याची भूमिका निभावेल. या संवादात पालकांना खूप संयम ठेवावा लागतो. ठाऊक आहे की हे कठीण काम आहे पण त्याचा फायदाही होत असतो.

६. 'विश्वास' हा दोन्ही बाजूंनी ठेवावा लागतो थोडक्यात पालकांनी मुलांवर विश्वास ठेवला, तर मुलंही तुम्हाला विश्वासार्ह वाटतील. तुमच्यात आणि तुमच्या टीनएजर्स मुलांमध्ये जी दरी निर्माण होते, त्याला कारणीभूत असतो अविश्वास म्हणूनच संवादाचा पूल बांधण्यासाठी 'विश्वास' उपयोगी ठरतो. तुम्ही मुलांवर विश्वास ठेवावा ही मुलांची अपेक्षा असते. 'विश्वास' ठेवायला तुम्ही कचरता ते मुलांच्या सुरक्षिततेच्या इच्छेने. मुलं कुठल्याही अडचणीत सापडू नयेत म्हणून तुम्ही विश्वास ठेवायला तयार नसता. पण जर तुमच्या टीनएजर्स मुलांवर तुम्ही सतत लक्ष ठेवत असाल, चुकले की त्यांना पकडत असाल किंवा वारंवार आपले पालक आपल्यावर 'हेलिकॉप्टरसारखे' गिरक्या घालत असतात असं त्यांना वाटत असेल, तर ते चांगल्या गोष्टींबाबतसुद्धा तुमच्याशी बोलणार नाहीत. योग्य मर्यादा आखून, मुलांची प्रायव्हसी जपून, मुलांचा आदर राखून पालक आणि मुलं यांच्यात विश्वासाचा पूल तयार होऊ शकतो.

जर तुम्ही असं म्हणत असाल की, त्यांच्यावर जी बंदी तुम्ही घालता ती त्यांनी सहन करावी, त्यांचा ठावठिकाणा, थांगपत्ता याबद्दल तुम्हाला माहिती द्यावी. तुम्ही त्यांना सतत मायक्रोमॅनेज करत असाल. त्यांच्या प्रत्येक हालचालींवर लक्ष ठेवून असाल, सगळी बारीकसारीक माहिती मिळवत असाल, तर मग मुलांचं नाराज होणं स्वाभाविकच आहे. त्यातूनच मग मुलं खोटं बोलायला लागतात. माहिती, मित्रपरिवार याबद्दल बोलणं टाळतात, दडवून ठेवतात. आपण काही प्रतिक्रिया दिली, तर त्याचे परिणाम होतील याची मुलांना जाणीव होते मग ते गप्पच राहणं पसंत करतात.

कुमारावस्थेतील मुलांचं पालकत्व निभावणं म्हणजे नकाशा न वापरता टीनएजर्सचा चक्रव्यूह भेदायचा असतो. या वयातील मुलं स्वतःच अस्तित्व, आयडेंटिटी ओळखायची धडपड करत असतात. स्वतःच्या मर्यादा आखण्याचा प्रयत्न करतात. त्यातूनच त्यांच्या मनातील भावनांची आंदोलने, त्यांचे चढ-उतार होत असतात.


त्यांच्या म्हणण्याला महत्त्व देऊन, त्यांच्या वाढत्या स्वातंत्र्याचा आदर करून, बोलण्यापेक्षा ऐकण्यावर भर देऊन आपणही त्यांच्या या प्रवासात त्यांच्यासोबत आहोत हे त्यांना दाखवायला हवे.

काही वेळेला खरोखरच आपल्याकडे सगळ्या गोष्टींची उत्तरं नसतात हे आपल्याला मान्य करायला हवे. हे जर मुलांशी तुम्ही बोलत राहिलात, तर मुलं तुमच्याकडे परत येण्याचा मार्ग तयार होतो. तुम्ही तो मार्ग जोपासत आहात हे लक्षात घ्या.

टीनएजर्स मुलं ही अंडर कन्स्ट्रक्शन अवस्थेत असतात. म्हणूनच आपण आपलं फस्ट्रेशन त्यांच्यावर न काढता संयम आणि सहानुभूतीने त्यांच्याशी वागलो, तर हे नातं समजुतीचं होईल.

अखेरीस टीनएजर्स मुलं आपण कोण आहात याचाच फक्त शोध घेत नसतात, तर जगातील परिस्थितीशी जुळवून घेणं यासाठीही प्रयत्न करत असतात हे आपण पालकांनी लक्षात ठेवायला हवं. थोडेसे सजग राहून प्रयत्न केला तर, आपण त्यांना किती छान गाईड केलं हे त्यांना मोठं झाल्यावर कळेल. जेव्हा मुलं मागे वळून आपल्या बदलाची वर्षे आठवतील तेव्हा त्यांना नक्कीच मनाशी वाटेल की, आपल्या आई-वडिलांनी खूप संयमाने, समजुतीने आणि विश्वासाने आपल्याला वागवले.

# समाजवादी विचारवंत ना. ग. गोरे





कोकण आयकॉन

**सतीश पाटणकर**

नारायण गणेश गोरे तथा नानासाहेब गोरे हे समाजवादी विचारवंत तसेच मराठी लेखक आणि भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सैनिक होते. नानासाहेब गोरे हे स्वातंत्र्यसैनिक, समाजवादी कार्यकर्ते, लेखक, वक्ते आणि विचारवंत. विधवेशी विवाह करणारे कर्ते सुधारक. 'नानासाहेब गोरे'या नावाने विशेष परिचित. विद्याभ्यास आणि स्वातंत्र्य लढ्यातील कारावास गणेशपंत ऊर्फ अण्णासाहेब गोरे हे कोकणातील देवगड तालुक्यामधील हिंदळे या गावचे राहणारे. मुंबईला मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर त्यांना शिक्षणखात्यात नोकरी लागली आणि ते पुण्याला आले.

पुणे येथील पर्वती मंदिर अस्पृश्यता निवारण सत्याग्रहापासून त्यांनी सार्वजनिक कार्यात भाग घ्यावयास सुरुवात केली. १९३० मध्ये महाराष्ट्र यूथ लीगचे ते चिटणीस झाले. १९३६-३९ मध्ये अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे ते सदस्य होते. काँग्रेस समाजवादी पक्षाच्या संस्थापकांपैकी नानासाहेब हे एक होते. थोर समाजवादी नेते ना. ग. गोरे यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. स्वातंत्र्यसंग्राम आणि समाजवादी चळवळ यातील त्यांचे योगदान मोठे होते. जीवनात आणि साहित्यात विचारांना प्राधान्य देणारा, माणसातल्या विवेकशक्तीवर अढळ श्रद्धा असणारा आणि स्वतःच्या जीवनात बुद्धिप्रामाण्याला सर्वोच्च स्थान देणारा हा समाजवादी विचारवंत कसा घडला, हे त्यांचे शिष्य व सहकारी म्हणून वावरलेले प्रा. ग. प्र. प्रधान यांनी "महाराष्ट्राचे शिल्पकार - ना. ग. गोरे' या पुस्तकात अतिशय ओघवत्या आणि प्रसन्न शैलीत लिहिले आहे. ना. ग. गोरे एका मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबात जन्मले आणि वाढले. समाजातील जातिव्यवस्थेच्या चौकटी, संकुचित समाजजीवन, रूढी-परंपरेचे वाढत जाणारे प्राबल्य, स्त्रियांची दयनीय अवस्था पाहून हा मुलगा लहानपणापासून अंतर्मुख झाला होता. लोकमान्य टिळक मंडालेहून सुटून आल्यानंतर एस. एम. जोशी, शिरुभाऊ लिमये, खाडिलकर आदी मित्रांसमवेत ते टिळकांचे दर्शन घेण्यासाठी गायकवाड वाड्यात गेले होते. फर्ग्युसन महाविद्यालयात शिकत असताना एस. एम. जोशी आणि ना. ग. गोरे जेव्हा फिरावयास जात, तेव्हा या ध्येयवादी तरुणांच्या चर्चेत मातृभूमीचे स्वातंत्र्य हाच विचार डोकावत होता. त्यातून त्यांचे मन कसे तयार होत गेले, याचे मार्मिक चित्रण आहे.

१९४८-५३ मध्ये समाजवादी पक्षाचे ते सहचिटणीस होते. पुढे १९५७-६२ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे प्रजासमाजवादी पक्षाचे ते खासदार होते. याच काळात या पक्षाचे ते सरचिटणीसही होते. १९६४ मध्ये याच पक्षाचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. १९६७-६८ मध्ये ते पुणे महापालिकेचे महापौर होते. १९७० पासून ते राज्यसभेचे सदस्य होते.

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत सक्रिय भाग घेऊन नानासाहेबांनी अनेकवार तुरुंगवास भोगला. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर पोर्तुगीज सत्तेपासून गोवा मुक्त करण्यासाठी १९५५ मध्ये झालेल्या गोवा विमोचन सत्याग्रहाचा त्यांनी प्रारंभ केला. त्याबद्दल त्यांना जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली होती; परंतु १९५७ मध्ये त्यांची सुटका करण्यात आली. नानासाहेबांनी बरेच लेखनही केले आहे. समाजवादाचा ओनामा (१९३५) हे त्यांचे पहिले पुस्तक. जुन्या हैदराबाद संस्थानातील गुलबर्गा तुरुंगात शिक्षा भोगत असताना फेब्रुवारी ते डिसेंबर १९४२ पर्यंत त्यांनी लिहिलेली दैनंदिनी कारागृहाच्या भिंती या नावाने १९४५ मध्ये प्रसिद्ध झाली. तुरुंगातील भेदक अनुभवांची प्रत्ययकारी चित्रण फीत आढळते. डाली (१९५६) हा त्यांचा ललितनिबंधसंग्रह. शंख आणि शिंपले (१९५७) मध्ये त्यांच्या आठवणी आहेत. सीतेचे पोहे (१९५३) आणि गुलबशी (१९६२) मध्ये त्यांच्या कथा संग्रहित केलेल्या आहेत. आव्हान आणि आवाहन (१९६३), ऐरणीवरील प्रश्न (१९६५) या पुस्तकांत त्यांचे वैचारिक लेख अंतर्भूत आहेत. कालिदासाच्या मेघदूताचा त्यांनी समछंद अनुवाद केला आहे. त्यांनी केलेल्या अन्य अनुवादांपैकी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या आत्मचरित्राचा अनुवाद विशेष उल्लेखनीय आहे. बेडूकवाडी (१९५७) आणि चिमुताई घर बांधतात (१९७०) ही त्यांनी लहान मुलांसाठी लिहिलेली पुस्तके. त्यांनी लिहिलेल्या अन्य पुस्तकांत विश्वकुटुंबवाद (कम्यूनिझम) (१९४१) आणि अमेरिकन संघराज्याचा इतिहास (१९५८) यांचा समावेश होता. मुरारीचे साळगाव (१९५४) हे त्यांनी प्रौढ साक्षरांसाठी लिहिलेले पुस्तक.

जनवाणी, रचना, जनता यांसारख्या नियतकालिकांचे त्यांनी संपादन केले. त्यातून, तसेच अन्य इंग्रजी, मराठी आणि हिंदी नियतकालिकांतून त्यांनी लेखन केले आहे. उत्तम वक्ते म्हणूनही ते प्रसिद्ध आहेत. रेखीव मांडणी, स्पष्ट विचार आणि अभ्यासपूर्ण विवेचन ही त्यांच्या वैचारिक लेखनाची आणि भाषणांची वैशिष्ट्ये. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

# राज्यात पिंक ई-रिक्षा योजना

**सक्षमीकरण**

## १० हजार महिलांना ई-रिक्षांचे वाटप

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महिला व बाल विकास विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या महत्वाकांक्षी 'पिंक ई-रिक्षा' योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील पात्र महिलांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवारी (दि. २०) १० हजार पिंक ई-रिक्षा वितरीत करण्यात आल्या. महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्या उपस्थितीत महिलांना सवलतीच्या दरात पिंक रिक्षा उपलब्ध करून देण्याच्या सरकारच्या योजनेची नागपूरात सुरुवात झाली आहे.

नागपूर शिवाय पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर, अमरावती या आठ जिल्ह्यात टप्प्याटप्प्याने पिंक रिक्षा गरजू महिलांना उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. पिंक रिक्षाच्या एकूण किमती पैकी २०% अनुदान राज्य सरकार देणार असून दहा टक्के रक्कम लाभार्थी महिलांना द्यावी लागणार आहे. तर उर्वरित ७० टक्के रक्कम सवलतीच्या व्याजदरावर कर्ज म्हणून उपलब्ध करून दिली जात आहे.यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील १० हजार महिलांना रोजगार देण्याचा उद्दिष्ट तर या योजनेमागे आहे.

सोबतच शहरात महिलांना सुरक्षित सार्वजनिक वाहतुकीचे साधन मिळावे, रात्री अप-रात्री महिला या पिंक इ-रिक्षाच्या माध्यमातून सुरक्षित फिरू शकतील. तसेच पिंक इ-रिक्षा योजनेच्या पहिल्या टप्प्याचा वितरण नागपुरातून करत आहे, याचा मला आनंद आहे, असं देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.



### लाडकी बहीण योजनेसारखीच ही योजना

पुढे बोलताना म्हणाले, लाडकी बहीण योजनेसारखीच ही पिंक इ रिक्षा योजना आहे. या माध्यमातून महिलांना पायावर उभा राहता आले पाहिजे, असा उद्देश आहे. तसेच कामकाजी महिलांना प्रवासात सेफ, सुरक्षित वातावरण मिळावं, म्हणून महिलाद्वारे चालवल्या जाणा-या इ-रिक्षा उपलब्ध करून देण्याचा उद्दिष्ट आहे, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### अशी आहे पिंक ई-रिक्षा योजना?

राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या वतीने महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पिंक ई-रिक्षा ही महत्वाकांक्षी योजना आहे. नागपूर जिह्यामध्ये २००० महिलांना पिंक ई-रिक्षा वाटप करण्याचे उद्दिष्ट दिलेले आहे.

### योजनेच्या नियम व अटी

'पिंक ई-रिक्षा' योजनेच्या लाभासाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न तीन लाखांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. अर्जदाराचे वय १८ ते ३५ वर्षांदरम्यान आणि महिलेकडे वाहन चालक परवाना असणे आवश्यक आहे. दारिद्र्यरेषेखालील महिलांना योजनेत प्राधान्य असून, सर्व स्तरांतील महिलांना योजनेत अर्ज करता येईल, असेही परिवहन विभागाने स्पष्ट केले.

# एमबीबीएस पदवी परिक्षा उत्तीर्ण

अभिनंदनिय: पायल मुंडेंनी पटकावला प्रथम क्रमांक



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:स्थित सनराईज इंग्लिश स्कुल अँड ज्यू. कॉलेज चे अध्यक्ष श्री. गोविंदराव शंकरराव मुंडे व सचिव सौ. प्रियतमा गोविंदराव मुंडे यांची कन्या कु. डॉ. पायल हिने अथक परिश्रम व जिद्दीच्या जोरावर एम.बी.बी. एस. ची पदवी प्रथम श्रेणीमध्ये प्राप्त करत डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण केले. तिच्या या यशाचे सर्व नागरिकांमधून कौतुक होत आहे. जुहू, मुंबई येथील हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय व आर. एन. कूपर हॉस्पिटल यातून तिने सदरील पदवीचे शिक्षण पूर्ण केले. नुकताच तिचा पदवीप्रदान सोहळा विलेपार्ले (पूर्व) मुंबई येथील मास्टर दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह या ठिकाणी मोठ्या थाटामाटात पार पडला.

डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगून ते पूर्ण करणे अत्यंत अवघड असते परंतु जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर काहीही करणे शक्य आहे असे उदाहरण कु. डॉ. पायलने एमबीबीएस ला जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना घालून दिले आहे. अशक्य ते शक्य करिती पान २ वर

# रस्त्याची चाळण,प्रवाशी हैराण

सवाल:तांबाराजुरी-रायमोह रस्ता दुरुस्ती कधी



पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा:तांबाराजुरी ते रायमोह दरम्यानचा मुख्य रस्ता सध्या अत्यंत खराब अवस्थेत असून, रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. या मार्गावर प्रवास करणे धोकादायक बनले असून, वाहनधारक व पादचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन चालावे लागत आहे.

हा रस्ता परिसरातील अनेक गावांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. दररोज शेकडो नागरिक, विद्यार्थ्यांचे शालेय वाहतूक वाहन, शेतकरी, तसेच रुग्णवाहिका या मार्गावरून जातात. मात्र, गेल्या अनेक महिन्यांपासून रस्त्याचे डागडुजीचे कोणतेही काम झाले नसल्यामुळे रस्त्यावर पान २ वर

# ग्रामसेवक निघाला भलताच चालू

बोंबला:गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली

पुण्यभूमी प्रतिनिधी

तलवाडा:ग्रामविकास अधिकारी यांची बदली होऊन त्यांच्या जागेवर मुसळे ग्रामसेवक यांची नियुक्ती करण्यात आली परंतु सतरा दिवस उलटून गेले तरी अद्याप पाटील ग्रामसेवक यांनी चार्ज दिला नसल्याचे समोर आले आहे.बदली होऊन ही अद्याप तलवाडा ग्रामपंचायत चां कारभार पाटील हेच पाहत असून गटविकास अधिकारी यांच्या आदेशाला एक प्रकारे डावलण्याचे काम होतांना दिसते.या काळात अनेक कामे होत नसल्याचा आरोप उपसरपंच यांनी केला असून ग्रामपंचायत ला कुलूप लावले आहे.जो पर्यंत पाटील ग्रामसेवक चार्ज देत नाहीत तो पर्यंत कुलूप उघडू देणार नसल्याचे सत्ताधारी उपसरपंच आक्रम सौदागर यांनी सांगितले.

तलवाडा ग्रामपंचायतीच्या कामाविषयी जनतेत मागील चार वर्षापासून रोष आहे सामान्य जनतेची कामे ग्रामपंचायत मध्ये झालीच नाही,,ग्राम पंचायत ही ग्रामीण भागातील लोकांच्या सक्षम तेचा कणा समजला जातो परंतु याला गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत आपवाद आहे. कारण याठिकाणी सामान्य जनेतेचे कोणतेच काम विणा मोबदला होत पान २ वर

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा संधी

शैक्षणिक:रमेश थावरे स्कुललाचा उपक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी



दिंद्रुड:ग्रामीण भागात इंग्रजी शाळांच्या रूपाने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कारकीर्द घडवण्याचे आदर्श काम केले जातय, विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनात शिक्षणाबरोबरच त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळवण्यासाठी करत असलेल्या कामाचे समाधान असल्याचे मत आयुष्यमान भारत मिशन चे राज्य अध्यक्ष डॉ ओमप्रकाश शेटे यांनी व्यक्त केले.माजलगांव तालुक्यातील आनंदगाव येथील कै.रमेशराव थावरे प्री प्रायमरी स्कूल च्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा आनंदोत्सवाचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते.

आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, सौ.शिल्पा शेटे,लक्ष्मण पोटभरे, सुप्रसिद्ध डान्सर वैभवी टाकणखार, संस्था अध्यक्ष रोहित थावरे यांची प्रमुख उपस्थिती याप्रसंगी होती.शहरी भागाबरोबरच आता ग्रामीण भागातील शैक्षणिक विकासाचा प्रवाह धावत असल्याचे चित्र ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत कुठेही कमी नसल्याचे दिसताना ग्रामीण भागातील इंग्लिश स्कूल विद्यार्थ्यांच्या सार्वभौम विकासासाठी तत्पर असल्याचे मत आयुष्यमान भारत मिशनचे राज्य अध्यक्ष पान २ वर

# पंकजा मुंडेनी दिलेल्या कोटींची वाट!

भुरटा गुत्तेदार: योजनेचे पाणी पंधरा गावांना कधी मिळणार?



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी सर्कल मध्ये ३२ कोटींची राष्ट्रीय पेयजल पाणी योजना पंकजा मुंडें यांनी दिली या पाणी योजनेमध्ये १५ गावाला पाण्याची सोय झाली पाहिजे परंतु आस होताना दिसत नाही कारण ही पाणी योजना पंचायत समिती सभापती परीमाळा घुले यांचे पती विष्णू घुले ला दिली होती पण या पाणी योजनेचे आता सध्या पाणी काही मोजक्या गावात पाणी येते या योजनेना जवळपास सात ते आठ वर्ष पूर्ण झाली आहेत तरी पण या पाणी योजनेचे पाणी गावा गावात येत नाही येवढे वर्षे झाली तरी पाणी आले नाही तर आता कधी येणार

या योजन मध्ये गुत्तेदार माल हानुन मोकळा झाला मंत्री पंकजा मुंडेचा कार्यकर्ता विष्णू घुले ला विचारलं तर तो म्हणतो या पाणी योजनेचा माझा काही संबंध नाही तर मग तुम्हीच सांगा या १५ गावांना कोण पाणी पाजणार सध्या इतका कडक उन्हाळा सुरू आहे तर या पाणी योजनेचे पाणी जर गावांना मिळत नाही तर योजनेचा काय फायदा का ही योजना फक्त गुत्तेदार पोसण्यासाठी झाली आहे असाच प्रश्न निर्माण झाला आहे.

# थंड हवेला महागाईच्या झळा!

दाहकता:कुलरच्या किमती भरमसाट वाढ

पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू असून तापमान अतिशय गरम होत चालले असून उन्हाळा तापत असतानाच ग्राहकाला महागाईचा झळा सहन करावा लागत आहे कुलर साठी लागणारी यंत्रसामग्री महागल्याने कुलरच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे उन्हाळ्यात थंड हवा महाग झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे एप्रिलमध्ये उन्हाची तीव्रता वाढली असतानाच एसी कुलर पण त्यांच्या महागाईच्या झळा ग्राहकांना सहन करावा लागत आहे.



थंड हवेची यंत्रसामग्री बनवण्यासाठी लागणारे वस्तूचे दर वाढले आहे त्यामुळे सध्या एसी कुलर पंख्याचे किमतीत वाढ झाल्याचे चित्र परिसरात मिळत आहे उन्हाची तीव्रता वाढत असल्याने बाजारात ग्राहकांची संख्या वाढली आहे कुलरच्या दरात वाढ यंदाच्या सीझनमध्ये २ हजार रुपये पासून ते २० हजार रुपये पर्यंतचे कुलर बाजारात उपलब्ध झाले आहे कुलर बनवण्यासाठी लागणारी मोटर फॅन पत्रा स्टील ताट्या आधी साहित्यामध्ये भरवाड झाल्याने कुलर च्या किमती वाढल्या आहे. कोपर आणि लोखंडाचे दर वाढले आहे परिणामी कुलर मध्ये असलेल्या किमती वाढल्या आहे दिवसा दिवस इंधनना चे भाऊ वाढत असल्याने त्याचे परिणाम आता वाहतूक खर्चावर होत आहे वाहतूक खर्च वाढल्यास या सर्व वस्तु च्या किमतीत आणखी काही टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यता आहे.

# चिंचोली माळीत खुलेआम दारु विक्री?

चर्चा:प्रशासन हप्ता घेऊन सुस्त

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज:तालुक्यातील चिंचोली माळी येथील अवैध दारू विक्री करणाऱ्या धाब्यावर कार्यवाही करण्यात येत नाही पोलीस प्रशासन कार्यवाही करण्यासाठी हतबल झाले आहे तहसीलदार, पोलीस प्रशासन हप्ता घेऊन सुस्त आहे का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.तसेच प्रशासनाचे व चिंचोली माळी येथील धाब्यावाल्यांचे लागेबांधे आहेत का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे तसेच पोलिस प्रशासन कार्यवाही करेन म्हटल्यावर धाबावाले म्हणतात पोलीस प्रशासनाला आम्ही चिरीमिरी पुरवत आहोत पोलीस प्रशासन आम्हाला काही करु शकत नाही म्हणजे केज पोलीस प्रशासन व तहसीलदार यांचे जिवन पाळीव प्राणी असल्या सारखे झाले आहे का असा प्रश्न उपस्थित होतो आहे म्हणजे चिरीमिरी घेऊन गप्प बसनारे पोलिस प्रशासनान हतबल झाले आहे व तहसीलदार, पोलीस प्रशासन हप्ता पान २ वर

**मिलिंद घाडगे**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव**

# डीजेच्या कर्कश आवाजाचा त्रास

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीत जे मोठ मोठे डीजे लावले जात आहेत.या डीजेच्या कर्णकर्कश आवाजाचा महिला, लहान मुले वयोवृद्धांना त्रास होत असल्याचे दिसत आहे त्यामुळे इतर वाद्यांचा जयंती मंडळांनी अवलंब करावा असे आवहान वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव यांनी केले ते मौजे नाथरा येथे विश्वरत्न, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.



सकाळी १० वाजता पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण होऊन प्रबोधनाचा कार्यक्रम उत्साहामध्ये घेण्यात आला. पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण गावचे उपसरपंच श्रीकांत मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष हनुमंतजी वाघमारे सर, भारतीय बौद्ध महासभेच्या शहराध्यक्ष आदरणीय प्रजावतीताई कांबळे, समता सैनिक दलाचे डॉ. स्वप्नील महाळंगीकर, समता सैनिक दलाचे यशपाल बचाटे, समता सैनिक दलाचे जयपाल पांचांगे, सुभाषजी मुंडे हे होते.

अध्यक्षीय समारोपात मिलिंद घाडगे यांनी सांगितले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक क्षेत्रामध्ये समाजाला पुढे नेण्याचे काम केले आहे. बाबासाहेब आंबेडकरांच्या अथक परिश्रमामुळेच आज समाज वैभवाचे जीवन जगत आहे. ज्या काळामध्ये खायला भाकर नव्हती त्या काळात प्रचंड उत्साहामध्ये बाबासाहेब आंबेडकरांची जयंती निघायची. आणि त्या जयंतीच्या मिरवणुकीमध्ये बाबासाहेबांचा जयजयकार करणाऱ्या प्रचंड घोषणा परिसर दणाणून टाकायच्या बाबासाहेबांचे अनुयायी वेगवेगळ्या कलाकुसर दाखवायचे लेझीम पथक असायचे हलक्या, ढोल, बँजो अशा प्रकारचे कानाला चांगले वाटावे असे सुमधुर वाद्य मिरवणुकीमध्ये वाजवल्या जायचे. परंतु आजची मिरवणूक वेगळ्या पद्धतीने भरकटत जाते की काय अशी भीती वाटू लागलेली आहे. डीजेच्या कर्कश पान २ वर

# खवतडचा आका विष्णू घुले!

चर्चा:जलजिवन कामाचा दहा गावाचा निधी हडप

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज: केज तालुक्यातील दहा गावांना जलजिवन पासून वंचित ठेवणारा जो गुत्तेदार आहे सुशांत खवतड याचा आका केज पंचायत समिती सभापती पती विष्णू घुले आहे सविस्तर केज तालुक्यातील दहा गावांचे काम सुशांत खवतड गुत्तेदारा कडे आहेत फक्त सुशांत खवतडच्या नावाने काम आहेत सुशांत खवतडची फक्त एजन्सी आहे खरी दहा गावचे जलजिवनचे काम विष्णू घुलेचे आहे सुशांत खवतड हा नावालाच आहे पण याचा खरा आका विष्णू घुले आहे हा विष्णु घुले हा कसा जनतेला येड्यात काढतो या जलजिवनच्या कामात यांने मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला आहे काही गावांमध्ये तर आजुन जलजिवनच काहीच काम केले नाही तरी पण पैसे उचलले आहेत विष्णू घुले हा तालुक्यातील एक भाजपचा व सध्या मंत्री असलेल्या पंकजा मुंडे यांचा कार्यकर्ता आहे हा जर स्वतःच्या सर्कलमधीच असा मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करतोय तर या जनता कशी माफ करना मंत्री पंकजा मुंडे यांनी अशा भ्रष्टाचारी लोकांना पान २ वर